

कलावंत

आणि

समाज

यांचा
संबंध
येतोच कोठे ?

# माणूस

शनिवार
दोन फेब्रुवारी १९७४
पन्नास पैसे



ग्रामायन

एक पुढचा टप्पा

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

२ फेब्रुवारी १९७४

# माणूस

वर्ष : तेरावे । अंक : छत्तीसावा

[ श्री. वैद्य आणि शहा यांचा मुस्लिम सत्यशोधकांविषयीचा वाद गेल्या अंकात समाप्त झाला. पण याबाबत खुद्द श्री. हमीद दलवाई यांची भूमिका कोणती ? त्यादृष्टीने त्यांचा हा खुलासा आवश्यक होता. म्हणून येथे दिला आहे. ]

श्री. प्रभाकर वैद्य यांनी प्रा. अ. भि. शहा यांना दिलेल्या उत्तरात त्यांच्या-माझ्या भेटीचा उल्लेख करून काही विधाने केली आहेत. (माणूस : दि. २६ जानेवारी १९७४ चा अंक) अरब-इस्रायल युद्धाच्या वेळी मुंबईत अमर हिंद मंडळाच्या एका सभेसंबंधी त्यांनी अशा पद्धतीने उल्लेख केला आहे की जणू शहांनी माझी फसगत केली अशी मी त्यांच्याशी खाजगी कबुली दिली ! माझ्या भूमिकेचा विपर्यास होऊ नये म्हणून मला ह्यासंबंधी हा खुलासा करावा लागत आहे.

युगांतरचा म. फुले विशेषांक प्रसिद्ध झाल्यानंतर किमान दोनदा श्री.प्रभाकर वैद्य यांची व माझी भेट झाली आहे. पहिल्यांदा सोसायटी फॉर दि इरॅडिकेशन ऑफ इनिक्वॉलिटी या संस्थेने सौ. मालतीबाई बेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली घेतलेल्या पहिल्या अधिवेशनाला मी गेलो असताना ते शेजारीच बसले असल्याचे दिसून आले. 'तुमचा लेख मला फार आवडला !' असे मी थट्टेने म्हणालो. त्यांनाही मी केलेल्या थट्टेचे हसू आले. 'आपण मागाहून बोलू' एवढेच त्यानंतर बोलणे झाले. परिषदेत सविस्तर बोलणे शक्य झाले नाही.

त्यानंतर माझे मित्र श्री. हेमंत गोखले यांच्या लग्नसमारंभाला गेलो असताना समोरच रहात असलेल्या माधव मनोहरांकडे मी सहज गप्पा मारण्यासाठी गेलो. तेथे श्री. वैद्य उपस्थित होते. 'शहांनी माझ्याकडे लांबलचक उत्तर पाठविले आहे' असे तेव्हा ते म्हणाले. उत्तरात शिव्याच लिहिल्या आहेत असेही म्हणाले. मी तोपर्यंत शहांचा लेख वाचला नव्हता त्यामुळे काही बोललो नाही. मी त्यांना पुढे म्हणालो, 'मुळात हा लेख लिहून तुम्ही माझ्यावर अन्याय केला आहे. तुमचा माझा इतक्या वर्षांचा स्नेह आहे.

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

लेख लिहिण्यापूर्वी तुम्ही माझ्याशी काही मुद्द्यांबाबत निदान चर्चा करायला हवी होती.' श्री. वैद्य यांनी यावर कोणतेच मतप्रदर्शन केले नाही. त्यानंतर अरब-इस्रायल युद्धासंबंधीच्या सभेसंबंधी बोलणे झाले.

श्री. प्रभाकर वैद्य माझी फसगत झाली असे ज्या बोलण्यासंबंधी म्हणतात ते या बोलण्यासंबंधीच! 'आपण सभेला उपस्थित होतात काय?' असे मी त्यांना विचारले. 'आपण उपस्थित नव्हतो.परंतु वृत्तपत्रांत जे आले आहे त्यावरून लिहिले.' आता वृत्तपत्रांत सध्याच्या कागदटंचाईच्या काळात जेथे पाच-सहा वक्ते बोलले अशा सभेतील माझेच तेवढे भाषण सविस्तरपणे प्रसिद्ध होऊ शकले नाही यात आश्चर्य मानण्याचे कारण नाही. तथापी जे वृत्त आले आहे त्यात इस्रायलला मी संपूर्ण पाठिंबा दिल्याचे आलेले नाही. 'जगा आणि जगू द्या' ही नीती आता अरब व ज्यूंनी अंमलात आणली पाहिजे असे महाराष्ट्र टाईम्स-मध्ये प्रसिद्ध झाले आहे. तर टाईम्स ऑफ इंडियामध्ये 'अरब निर्वासितांवर अन्याय झाला आहे. परंतु आता इस्रायल नष्ट करण्याचा अन्याय करून अरबांवरील अन्यायाचे परिमार्जन करणे हा काही मार्ग ठरत नाही' असे आले आहे. मला वाटते, या वृत्तांतात माझी भूमिका स्पष्ट होते, हे मी श्री. वैद्य यांच्या निदर्शनास आणले.

मुळात ही सभा श्री. ठाकरे यांनी बोलावली होती, त्यांनी मला सभेला बोलावले, शहांनी नव्हे. ठाकरे यांच्याकडे जाऊन मी त्यांच्याशी आधी संपूर्ण चर्चा केली होती. माझी भूमिका इस्रायल नष्ट होऊ नये ही आहे. परंतु इस्रायलने व्याप्त प्रदेशातून मागे हटले पाहिजे व अरब निर्वासितांचा प्रश्न सोडविला पाहिजे असेही माझे मत आहे व ते मी मांडीन, असे मी त्यांना सांगितले. 'तुम्ही ही भूमिका जरूर मांडा. शेवटी सभा यादेखील लोकशिक्षणाचा कार्यक्रम असतो' असे ठाकरे म्हणाले. परंतु प्रत्यक्ष सभेला मात्र काहीसे मुस्लिम विरोधी स्वरूप आले. विशेषत: धों. वि. देशपांडे हे मुसलमान म्हणजे जनावरे आहेत असे बोलले. यासंबंधी माझी नापसंतीही श्री. ठाकरे यांना मी मागाहून भेटलो तेव्हा बोलून दाखविली. स्वत: ठाकरे यांनी सभेत घेतलेल्या भूमिकेसंबंधीदेखील माझे मतभेद मी ठाकरे यांच्यापाशी बोलताना व्यक्त केले.

हे सगळे मी श्री. वैद्य यांच्याशी बोललो ही एक वस्तुस्थिती आहे. परंतु यात माझी फसगत झाली अशी कबुली कशी होते, हे मला कळलेले नाही. सभा मी आयोजित केलेली नव्हती. माझी भूमिका मी मांडली. इतरांनी आपल्या भूमिका मांडल्या. अशा प्रकारच्या सभेला मग तुम्ही जायला नको होते असा मुद्दा श्री. वैद्य यांनी मांडला. मी म्हणालो, 'हा वेगळा मुद्दा आहे.' मला जबरदस्तीने कुणी नेलेले नव्हते. मी इतका नेभळट आहे असे वैद्य का समजतात हे मला समजलेले नाही. माझे मतभेद असलेल्याबरोबर मी एखाद्या प्रसंगी व्यासपीठावर एकत्र येऊ नये ही भूमिका मला अमान्य आहे.

या सभेत मला जणू शहांनी जबरदस्तीने आणले असे जे श्री. वैद्य यांनी

सूचित केले आहे त्यामुळेच या सगळ्या खाजगी बोलण्याची मी आज प्रथमच चर्चा करीत आहे. हे बोलणे झाले तेव्हा माझे मित्र श्री. माधव मनोहरही उपस्थित होते. श्री. वैद्य यांनी आपल्या उत्तरात या भेटीचा संदिग्ध उल्लेख करून दिशाभूल करण्याचा प्रयत्न करावा याचे मला दुःख होते.

उरला प्रश्न शहा यांच्या मुस्लिम सत्य-शोधक मंडळाला होणाऱ्या सहकार्या-बाबत. श्री. शहा यांचे व माझे काही बाबतीत कधी मतभेदही होतात हे मी श्री.वैद्य यांच्या याप्रसंगी निदर्शनास आणू इच्छितो. अरब-इस्रायल वादासंबंधी आमची भूमिका मिळतीजुळती नाही. शेख अब्दुल्ला यांच्या सध्याच्या भूमिके-बाबत देखील माझे व शहांचे मूल्यमापन वेगवेगळे आहे. परंतु हे मतभेद मूलभूत धोरणासंबंधी नसून काही व्यक्तींच्या अथवा घटनांच्या संबंधींचे आहेत व सध्याच्या लोकशाहीवाद्यांमध्ये जसे असतात तसे आहेत. असे मतभेद असणे हे मी आमच्या आंदोलनाच्या भवितव्याच्या दृष्टीने गैर मानीत नाही. मतभेद फक्त दगडधोंड्यात आणि सोव्हिएट रशियात असत नाहीत ! पण हा मुद्दा वेगळा. असे मतभेद असूनही श्री. वैद्य यांचे सहकार्य मला माझ्या कार्यात मिळत असेल तर ते घ्यावयास मी केव्हाही तयार आहे इतकेच अखेरीला जाहीर करू इच्छितो.

**हमीद दलवाई, मुंबई**

# विदर्भ आणि माणूस

**१८ जानेवारी ७४**

■ 'ग्रामस्वराज्य'च्या (यवतमाळ : संपादक सुधाकर नाईक) दिवाळी अंकात प्राध्यापक उर्ध्वरेषे यांनी मा. अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण यांची घेतलेली मुलाखत आहे. वृत्तपत्राविषयी प्रश्नाच्या उत्तरात यशवंतरावांनी 'माणूस (साप्ताहिक)' मधील लिखाणाचा 'आशावादी व नवी दिशा दाखविणारे लिखाण' म्हणून कौतुकास्पद स्पष्ट उल्लेख केला.

एकूण माणूसमधील लिखाण खरोखरच वास्तववादी. पण एक गोष्ट मात्र खटकते. ती ही की, पूर्व व मध्य महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या अत्यंत महत्त्वाच्या कापूस एकाधिकारावर एवढे वादंग माजूनही आपण अवाक्षरही लिहिले नाही.

महाराष्ट्राच्या सत्तासूत्रधाराच्या गावातून–खुद्द पुसद आणि आसपासच्या गावाहून हजारो गाडी कापूस एकाधिकार असताना आंध्रप्रदेशात अदिलाबादला गेला. त्यात अतिउच्च सत्ताधिकाऱ्याचा व त्यांच्या लाग्याबांध्यातला माल ट्रकने बिनधोक गेला व गरीब शेतकऱ्यांच्या गाड्यांना पोलीस व एस. आर. पी. ने (लक्षावधी रुपये) लाचलुचपत खाऊन त्रास दिला.

अकोल्याला जनसंघाकडून झालेला कापूस सत्याग्रहही आपल्या नजरेतून सुटला. एकूण विदर्भात माणूसचा वाचकवर्ग फार मोठा आहे. विदर्भाच्या महत्त्वाच्या घडामोडींवर दुर्लक्ष नको.

**देवीचरण जयस्वाल**
मु. पोखरी, पो. कोंदरी
ता. पुसद, जि. यवतमाळ

मुक्काम मुंबई

# महिलांचा केरसुणी मोर्चा

भारतकुमार राऊत

तेवीस जानेवारी. बुधवारचा दिवस. दुपारी दीड वाजल्यापासूनच आजाद मैदान गजबजू लागते. निळया ड्रेसमधले पोलीस सकाळी दहा वाजल्यापासूनच विडीकाडी करीत बसलेले असतात. निळया साडयावाल्या महिला पोलीस सुद्धा आज मोठया संख्येने आजाद मैदानावर वावरत असतात.

हळूहळू मैदानाच्या महापालिकेकडल्या कोपऱ्यावर बायका जमू लागतात. थोडावेळ शांततेत जातो. बघता बघता जवळ जवळ दीड दोन हजार बायका जमतात. झाडांच्या पारावर पहुडलेले पोलीस उठून आपल्या अर्ध्या चड्डया झटकून व्यवस्थित उभे राहतात. इतक्यात कुणीतरी म्हणते, 'आल्या, आल्या, मृणालताई आल्या.' मग साऱ्या दोन अडीच हजार महिलांत उत्साह संचारतो.

'नही चलेगी, नही चलेगी,' एक बाई शिरा ताणून ओरडते. 'वसंतराव की दादागिरी नही चलेगी.' घोषणेला जबरदस्त प्रतिसाद मिळतो. मग आणखी मोठ्याने घोषणा. पुन्हा प्रतिसाद. घोषणांचा गदारोळ सुरू होतो. मैदानातल्या महिलांची संख्या पाच हजारावर गेलेली असते. घोषणा वाढत राहतात. टोळक्या टोळक्यांनी महिला येत असतात. समोरच महापालिका कार्यालय. त्याच्या सर्व खिडक्यातून मैदानातल्या महिला पाहायला झुंबड. मग कुणीतरी आवाहन करते, 'बघता काय ? बघता काय?... सामील व्हा ! सामील व्हा !

आणि या आवाहनाला प्रतिसाद मिळतो. महापालिका कार्यालयातल्या लिफ्टचा वेग वाढतो. गटागटाने महिला ऑफिस सोडून मैदानात येतात. मैदानातल्या महिलांची संख्या फुगत जाते. फोर्ट भागातल्या इतर अनेक ऑफिसातल्या महिला कर्मचारीसुद्धा आजाद मैदानात येऊन दाखल होतात. सूर्य डोक्यावरून खाली ढळत असतो. जवळ जवळ दहा हजार महिला एकत्र आलेल्या असतात.

टोकपदरी साडीपासून फूलवॉयलपर्यंत आणि स्लीव्हलेसपासून नऊवारी पर्यंत सर्व बायाबापडया आणि आयाबाया एकत्र असतात. महागाई विरोधी संयुक्त महिला प्रतिकार समितीनं मोर्चा आयोजीत केलेला असतो. बारा किलो धान्य रेशनवर मिळालंच पाहिजे ही महिलांची मुख्य मागणी. याखेरीज सचिवालयात महिला निदर्शकांवर झालेल्या अत्याचाराचा निषेध वगैरे पुरवणी प्रश्न.

हळू हळू घोषणा कमी होतात. मैदानावर इतस्ततः उभ्या असलेल्या महिलांच्या रांगा लावण्याचं काम सुरू

होतं. सर्वात पुढे समितीचे निशाण असते. त्यामागे हातात काटेरी दंडुका घेतलेलं वसंतराव नाईकांचं व्यंगचित्र आणि बांबूवर बांधलेली मोठी केरसुणी. आजाद मैदानातून मोर्चा बाहेर पडतो. आमदार मृणाल गोरे, नगर सेविका अहिल्या रांगणेकर, खासदार रोझा देशपांडे, प्रमिला दंडवते, सुशिला पटेल, प्रेमा पुरव आदि महिला बिनीवर असतात. प्रथम पोलिस कमिशनरांच्या कचेरीवर जायचं, मृणाल गोरे सांगतात. मोर्चा त्या दिशेनं वळतो. आता मोर्चातल्या महिलांची संख्या पंधरा हजारावर गेलेली असते. लोकमान्य टिळक मार्गावर मोर्चा वळतो तरीसुद्धा कित्येक महिला आजाद मैदानातून बाहेर पडलेल्या नसतात.

एव्हाना महिलांच्या बरोबरीनं अनेक पुरुष सुद्धा मोर्चात सामील झालेले असतात. त्यांच्या घोषणांचा आवाज वाढत जातो. मग पुरुष आणि महिला यांच्यात घोषणांची चढाओढ लागते. इतक्यात मृणाल गोरे मागे येतात. हात जोडून म्हणतात : 'पुरुषांच्या सहानुभूतीची आम्हाला जाणीव आहे पण हा मोर्चा महिलांचा आहे. पुरुषांनी कृपा करून त्यात सक्रीय भाग घेऊ नये'. काही पुरुष मोर्चातून बाहेर पडतात पण बरेचसे तसेच रहातात. त्यांच्या घोषणांचा आवाज मात्र कमी होतो.

मोर्चा कमिशनरच्या ऑफिस समोर येतो. घोषणांना धार चढते. 'महिलांवरील अत्याचारांचा धिक्कार असो!' 'महिलांवर अत्याचार करणाऱ्या पोलिसांचा निषेध असो!' वगैरे. एक शिष्टमंडळ पोलिस कमिशनरना भेटायला जाते. मोर्चा पुढे निघतो.

आता मोर्चाला जोश आलेला असतो. एवढया प्रचंड मोर्चामुळे क्रॉफर्ड मार्केट परिसरातली वाहतूक थंडावते. सिग्नल उगाचच डोळे लाल, हिरवे करीत असतात पण समोर महमद अलि रोडवर आणि लोकमान्य टिळक रस्त्यावर अडलेल्या गाड्यांची मोठी रांग दिसत असते. मोर्चातल्या महिलांना त्याची पर्वा नसते. रोज साड्या आणि शेजारणीच्या गोष्टी करणाऱ्या या महिला आज सरकारचा निषेध करीत असतात. भारताच्या पंतप्रधान एक महिला आहेत, याबाबत अभिमान बाळगणाऱ्या त्याच महिला आज घोषणा देत असतात, 'इंदिरा तेरे राज में, भूस्सा मिलता राशनमें!' बोरीबंदरच्या नगर चौकातून मोर्चा पुढे निघतो. 'चलो सचिवालय.' सचिवालयाच्या दिशेने महिलांची फौज निघते. घोषणांचा गदारोळ चालूच असतो.

मोर्चा हुतात्मा चौकाजवळ येतो. सचिवालयाच्या दिशेनं वळणार, इतक्यात कुणीतरी बातमी आणते की, 'सचिवालयात कुणीच मंत्री नाही.' बिनीच्या महिला थबकतात. गोरे, रांगणेकर, देशपांडे, दंडवते, पटेल वगैरे नेत्या आपआपसात चर्चा करू लागतात. त्यांच्या भवती इतर महिला कोंडाळे करतात. निर्णय होतो. 'जिथं मंत्री

पृष्ठ ३१ वर

# डॉक्टर जगवितात की नागवितात ?

## (परिसंवाद वृत्तांत)

पूना डेक्कन जेसीजच्या वतीने 'डॉक्टर जगवितात की नागवितात ?' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. डॉ. अरुण लिमये, डॉ. एस. एन. देशपांडे आणि डॉ. ए. व्ही. संगमनेरकर यांनी या परिसंवादात आपले विचार मांडले. परिसंवादाचा समारोप खासदार नानासाहेब गोरे यांनी केला.

काही महिन्यांपूर्वी डॉ. अनिल अवचट यांनी याच विषयावर एक खळबळजनक लेख लिहिला होता. त्या लेखाने महाराष्ट्रातील समस्त डॉक्टरवर्गात प्रचंड वादळ उठवले. इंडियन मेडिकल असोसिएशनने तर डॉ. अवचट यांना 'शोकॉज नोटिस' दिली. परंतु या लेखामुळे डॉक्टरवर्ग खडबडून जागा झाला एवढे मात्र खरे. आपल्याच एका समव्यावसायिकाने आपली काळी कृत्ये चव्हाटयावर मांडावीत याचा त्यांना निश्चितच राग आला असणार. पण त्यातील जळजळीत सत्य तर त्यांना नाकारता येत नव्हते, वस्तुस्थिती लपवता येत नव्हती.

आणि आज याच विषयावर काही डॉक्टर्स आपल्या विचारांची देवाणघेवाण करण्याकरिता समोरासमोर आले आहेत. आपली बाजू मांडण्याकरिता जय्यत तयारीनिशी ते मराठा-चेंबर ऑफ कॉमर्सच्या टिळकरोडवरील सभागृहात जमले आहे. समोरच्या श्रोतृवर्गातही बहुसंख्य डॉक्टर्स दिसताहेत. तशीच इतर क्षेत्रातली मंडळीही मोठ्या संख्येने उपस्थित आहेत. आपल्यावरील आरोप, आपल्या भानगडी सर्व वेशीवर टांगल्या जाणार आणि आपण उघडया डोळ्यांनी पहाणार... की कुणी आपलीही बाजू ठामपणे मांडणार आहे ? आहे त्या वस्तुस्थितीला लपविण्यासाठी कोणकोणते युक्तिवाद केले जाणार आहेत...? श्रोतृवर्गातील डॉक्टरवर्गात एकच खळबळ उडालेली आहे...व्यासपीठावर या परिसंवादात भाग घेणारे प्रमुख वक्ते आहेत.. पूना डेक्कन जेसीजचे पदाधिकारी बसले आहेत नि राजकारणी समाजवादी नेते नानासाहेब गोरेही आहेत. हे या समस्येतून कोणता मार्ग सुचविणार आहेत...?

डॉ. अरूण लिमये.. हे काही काळ डॉक्टरचा व्यवसाय केलेले...सध्या

कायद्याचा अभ्यास करीत असलेले आणि समाजकारणात-राजकारणात भाग घेणारे तरुण बंडखोर नेते . वाग्युद्धाला तोंड फोडतात तेच, ' या देशातील डॉक्टरांच्या संघटना इंडियन मेडिकल कौन्सिल काय किंवा इंडियन मेडिकल असोसिएशन काय–त्या आपली कर्तव्ये यथायोग्य पार पाडीत नाहीत. वैद्यकीय क्षेत्रात, शिक्षण क्षेत्रात आणि इतरही अनेक क्षेत्रात चालू असलेल्या भ्रष्टाचाराइतकाच भ्रष्टाचार आज माजलेला आहे. सामान्य जनतेला डॉक्टर्स नागवितात ही घोषणा खरी आहे. संख्येने कमी असतील परंतु ही वस्तुस्थिती आहे. ती नाकारता येणार नाही. '

–आणि डॉ. लिमये आपल्या टिपणांच्या आधारे एकामागून एक मुद्दे मांडीत...उदाहरणे देत देत सांगू लागतात .. ' आम्ही डॉक्टर्स नागवतो असा कबुलीजबाब प्रामाणिकपणे देणारे डॉक्टर्सही आहेत. ते म्हणतात, आम्ही का नागवतो हे समजून घ्या. आम्ही केलेला प्रचंड खर्च (कॅपिटेशन फी वगैरे वगैरे) भरून काढण्यासाठी आम्ही नागवतो...जनता नादान आहे. जनतेच्या मूर्खपणाचा आम्ही फायदा घेतो. आणि याच्याही पुढे जाऊन असाही युक्तिवाद केला जातो की, जे डॉक्टर्स नागवितात ते त्यांची तितकी लायकी आहे म्हणूनच ते मिळवितात. या सर्व वागणुकीला, फसवणुकीला सामाजिक परिस्थितीच कारणीभूत आहे... तिचाच हा अपरिहार्य परिपाक आहे. त्यांच्याजवळच व्यावसायिक कौशल्य आहे तेच स्वतःची स्वतंत्र प्रॅक्टिस चालवून जबर कमवून बसले आहेत. गरिबांसाठी वेगळे दवाखाने–सरकारी हॉस्पिटल्स आहेत की ! हेच डॉक्टर्स तिथेही असतात– ऑननरी ! ससून हॉस्पिटलला लोक ' डायसून ' हॉस्पिटल म्हणू लागले आहेत. बाहेर ज्यांचे दवाखाने आहेत असे हे डॉक्टर्स...जसे शिक्षणक्षेत्रात क्लासवाल्यांचं आहे तसंच येथेही आहे. यामुळेच तर त्यांची प्रॅक्टिस वाढत असते. प्रायव्हेट नर्सिंग होम्स किती तेजीत चालतात. कॉर्पोरेशनने जर पेठवार चांगली नर्सिंग होम्स काढली तर ही प्रायव्हेट नर्सिंग होम्स चालतील का ? पण हा सर्व विशिष्ट धोरणाचाच परिणाम आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून आपण किती मिळविलं नि किती गमावलं याचा विचार केला तर लक्षात येईल की जे कमावलंय ते सगळं ढेरपोट्यांच्या पोटातच गेलंय. याला कारणीभूत आपले नेभळट सरकारी धोरण. तुम्ही बघा, सर्वत्र डॉक्टर हा संपन्न वर्ग आहे. हा डॉक्टरवर्ग सामान्य जनतेला नागवितो की नाही हा खरा प्रश्न आहे. एकटा दुकटा डॉक्टर फसवीत असेल ते जाऊ द्या पण आज कोणीही स्वतःला डॉक्टर म्हणवून घेतात आणि सर्रास फसवणूक करीत असतात. इंडियन मेडिकल कौन्सिल आणि असोसिएशनच्या कक्षेत येणाऱ्यांचा आपण विचार करू. जे जनरल प्रॅक्टिशनर्स आहेत ते हळू हळू नागवतात तर जे स्पेशालिस्टस् आहेत ते एकदम नागवतात. डॉक्टरकीचा व्यवसाय आता

संपला असून तो एक धंदा झाला आहे. पैसा देणाऱ्या पेशंटचा अनुनय येथे केला जातो. पेशंटच्या मर्जीनुरूप ट्रिटमेंट बदलणारे डॉक्टर्स आज आहेत, बिलाची गोळाबेरीज चार-पाच रुपयांपर्यंत आणण्याकरिता इंजेक्शन दिले जाते. एक्झॅमिनेशन फीच्या नावाखाली अव्यापारेषु व्यापार चाललेला असतो. स्टेथास्कोपचा उपयोग केला जातो तो पेशंटच्या खिशात पैसे आहेत की नाही हे पाहण्याकरिता. ऑक्युपेशन हिस्टरी विचारली जाते ती पेशंटची सांपत्तिक स्थिती अजमावण्यासाठी.' इथे श्रोतृवर्गात हास्याची लाट उसळते. डॉक्टर्सही हसताहेत आणि नागवले जाणारे सामान्य जनही. डॉ. लिमये डॉक्टरांच्या युक्त्याप्रयुक्त्या उघड करून सांगत असतात.

" पुस्तकात नाहीत ते रोग प्रत्यक्षात होतात. मुंबईच्या लोकांना तर नेहमी टायफॉइड होतो...त्यातून कधी कावीळ होते. तर कधी दोन्हीही एकदम होतात. घटसर्प झाला आहे असे खोटेच सांगून तीनतीन–चारचार दिवस अडकवून ठेवले जाते पेशंटला. याच्यापुढे हा नीचपणा अगदी या थराला जातो की, पॅथॉलॉजिस्टला फोनवरून सांगितले जाते की, ' डिप्थेरिया ' आहे असे सांग. कॅप्सूल म्हणून ॲस्पिरिनची पूड भरून दिली जाते. अशा नाना प्रकारच्या हिकमती डॉक्टरलोक लढवीत असतात. यातील कित्येक डॉक्टर्स सरकारी योजना राबवणारे असतात. सरकारने ठरवून दिलेले दर मान्य करून लायसेन्स मिळवितात आणि नंतर लांडचालवाड्या करून पैसा मिळवतात. हे झाले जनरल प्रॅक्टिशनर्सच्या बाबतीत, स्पेशालिस्ट डॉक्टरांची तर अलीबाबा आणि चाळीस चोरांप्रमाणे सोनेरी टोळीच असते. एकाने दुसऱ्याकडे, दुसऱ्याने तिसऱ्याकडे असे पेशंटला पाठवीत राहायचे आणि डायरेक्ट-इनडायरेक्ट कमिशन मिळवायचे. स्पेशालिस्टचे इन्व्हेस्टिगेशन ही तर एक अटळ बाब असते. रुबी हॉलसारख्या प्रसिद्ध हॉस्पिटलमध्ये ॲनास्थेटिस्टकडून वीस टक्के देणगी म्हणून कापून घेतले जातात. या कारणाकरिता पोस्ट नाकारणारे एक-दोनजण निघतात पण इतरांचे काय ? शिक्षणक्षेत्रातील नागडा उघडा भ्रष्टाचार इथंही चाललेला दिसतो. खोटी सर्टिफिकेटस् देणे हा तर या व्यवसायाचा एक भागच बनून गेला आहे. त्याचेही चार्जेस ठरलेले असतात. अशी काही मंडळी या व्यवसायात आहेत की ती हे सर्व खुलेपणाने मान्य करतात, ते वेगळे परंतु काही ढोंगी लोकांना सामाजिक प्रतिष्ठाही हवी असते आणि पैसाही. '

' डॉक्टर जीव वाचवतो म्हणून त्याला देवदूत म्हटले जाते. ते त्याचे कर्तव्यच आहे. परंतु आज हा डॉक्टर व्यवसाय स्पष्टच बोलायचं तर वेश्याव्यवसायाच्या पातळीवर आला आहे. डॉक्टरांना बुडालेल्या पैशाची फिकीर नसते कारण या व्यवसायात प्रॉफिट मार्जिन पुष्कळ असते. डॉक्टर उधारी ठेवतात याचे कारण हेच. खिसेकापू जसा गर्दीचा फायदा घेतात तसे डॉक्टर्स

पृष्ठ २९ वर

# कलावंत आणि समाज यांचा संबंध येतोच कुठे ?

देवीदास बागूल

कलावंत जसाजसा लोकाभिमुख आणि लोकप्रिय होऊ लागला तसतसा तो अनेक आणि विविध अडचणीत सापडू लागला. ह्या सर्व अडचणींपैकी एक अडचण अधूनमधून डोके वर काढीत असते. आणि आजकाल तर ती अडचण इतकी माजली आहे की काही कलावंत लोकही ती अडचण नसून एक अपरिहार्य घटक आहे असे समजू लागले आहेत. कलावंताला सामाजिक जबाबदारी ही अडचणीसारखी वाटत आली आहे. ह्या जबाबदारीची जाणीव कलावंतांना लोकांनी करून द्यावी हे एकवेळ समजण्यासारखे आहे. पण आजकाल कलावंतांपैकीच काहीजण जेव्हा असे म्हणतात की, 'खरंच, कलावंताने समाजासाठी काहीतरी केले पाहिजे.' तेव्हा मात्र कलावंत आणि समाज यांचा संबंध असतो काय ? या प्रश्नाची उकल करून घेण्याची गरज आहे असे तीव्रतेने वाटते.

## मतलबी कलावंत

कलावंताने समाजासाठी काहीतरी केले पाहिजे, असे किंवा अशा अर्थाचे जेव्हा केव्हा बोलले जाते तेव्हा तेव्हा असले बोलणे समाजाला फार रुचकर लागते. कधी कधी तर ह्या असल्या बोलण्याला खुद्द कलावंत लोकही आपल्या मतलबी बोलण्याने खतपाणी घालीत असतात. ते म्हणतात की, 'समाजाने आमच्या कलाकृतीची दखल घेतली पाहिजे. एकवेळ आमच्या कलाकृतीवर समाजाने कडक टीका केली तरी चालेल, पण तिची उपेक्षा करून तिला दुर्लक्षित मात्र करू नये.' आणि उपेक्षेचे दुर्भाग्य वाटचाल करून येऊ नये म्हणून हे कलावंत आपली कलानिर्मिती समाजापुढे सादर करत असतात.

## कलाकृतीशी संबंध

कलावंत आपली कलाकृती समाजापुढे सादर करतो ह्या घटनेमुळेच कलावंत आणि सामाजिक जबाबदारी ही समस्या निर्माण झाली आहे. पण थोडा तटस्थ विचार केला तर काय लक्षात येईल ? कलावंत आणि समाज यांचा संबंध खरोखर कधी प्रस्थापित होतो काय ? हाच प्रश्न दुसऱ्या प्रकारे मांडू या. कलावंत आणि समाज यांचा संबंध येतो की कलाकृती आणि समाज यांचा संबंध येतो ? समाजाचा संबंध नेहमी कलाकृतीशीच येतो. लेखक कथा, कादंबरी, नाटक लिहितो. ते साहित्य

छापील रूपात समाजात येते आणि समाज ते साहित्य वाचतो–पाहतो. इतर कलांच्या बाबतीत वरवर पाहता कलावंत आणि समाज यांचा संबंध असल्यासारखा वाटतो. गायक–नट यांच्या बाबतीत असे वाटते की इथे तरी कलावंत आणि समाज यांचा संबंध आहे. पण बारकाईने पाहिले तर लक्षात येते की येथेही समाज आणि कलावंत यांचा संबंध नसून, अभिनय, गायन, नृत्य यांचा आणि समाजाचा संबंध येतो.

## आस्वाद कोण घेतो ?

याचा अर्थ असा की कलावंताचा संबंध समाजाशी येतो तो कलाकृतीमुळे, कलाकृतीमार्फत, कलकृतीमधून. म्हणजे समाजाचा संबंध येतो तो कलावंताशी नव्हे, तर कलाकृतीशी. आता कलाकृती आणि समाज यांचा हा जो संबंध येतो तो तरी कशा प्रकारचा असतो ? किंवा, मी तर असे म्हणेन की कलाकृतीशी तरी समाजाचा संबंध येतो काय ? हा प्रश्न वरवर पाहता फार निरर्थक वाटेल. वाटेल की, सबंध समाज हा नाटक पाहतो, गाणे ऐकतो, असे ढळढळीत दिसत असताना 'समाज आणि कलाकृती यांचा संबंध येतो काय ?' असा प्रश्न उपस्थित करता तरी येईल काय ? आणि जर कलाकृती पाहणारा, तिचा आस्वाद घेणारा घटक हा ज्याला समाज समाज म्हणून म्हणतात तो नसेल तर मग कोण असतो ?

हा प्रश्न समजावून घेण्यासाठी दुसरी एक घटना आपण उदाहरणादाखल घेऊ या. जाहीर व्याख्यान ऐकण्यासाठी हजारो लोक जमतात. हे जे जमलेले हजारो लोक व्याख्यान ऐकतात ते मात्र समाज म्हणून ऐकत असतात. समाज म्हणून ऐकतात याचा अर्थ असा की, ते व्याख्यान ऐकताना त्या सर्व लोकांचे समान हितसंबंध जागे झालेले असतात. धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांच्यासाठी प्राथमिक गरज म्हणून ज्या अन्नवस्त्रनिवारा बाबींची आवश्यकता लागते त्यांच्या तरतुदीतील तयारीसाठी त्या लोकसमूहाने काही विधीनिषेध पत्करलेले असतात. आणि असल्या विधिनिषेधांच्या संदर्भात जर काही उलथापालथ होऊन हितसंबंधाना धोका पोचणार असेल किंवा अधिक वाव मिळणार असेल तर त्या संदर्भात होणारे व्याख्यान ऐकताना तो लोकसमूह समाज म्हणून श्रवण करीत असतो. आणि ते सर्वजण समाज म्हणून ऐकत असतात म्हणूनच वक्त्याला तो सर्व समाज हलवून सोडण्याची करामत करता येते. कारण वक्ता जे काही बोलत असतो ते त्या लोकांच्या समाज म्हणून जगण्याशी संबंधित असते. तो वक्ता समाजाच्या जिव्हाळ्याचा, गरजेचा प्रश्न समजावून सांगत असतो. महागाईसारखा आर्थिक प्रश्न, पंढरपूरच्या मंदिरप्रवेशासारखा धार्मिक प्रश्न, कुटुंबनियोजनासारखा कामविषयक प्रश्न इत्यादींबद्दल जेव्हा व्यासपीठावरून बोलले जाते तेव्हा ते बोलणे व्यक्तीव्यक्तीला समाजाचा घटक म्हणून ऐकावे लागते. म्हणूनच त्या ठिकाणी एकेक माणूस दिसत असला तरी तो ऐकण्याच्या बाबतीत

संघटित झालेला असतो. म्हणजेच अशा प्रकारचे व्याख्यान लोकांना संघटित करते. वक्ता श्रोत्यांना सामाजिक पातळीवर नेऊन संघटित करीत असतो.

## आस्वादक व्यक्ती

कलाकृतीच्या दर्शन–श्रवणाच्या वेळी मात्र नेमके उलट होत असते !

गाण्याची एखादी मैफल घ्या.

गाणं सुरू होण्यापूर्वी जमलेले लोक सामाजिक पातळीवर बोलत चालत असतात. त्यांची मने संघटीत झालेली असतात. एक दुसरीला विचारते, 'कुठून घेतलंस हे पातळ ? किनार कित्ती छान आहे !' कुणी उद्गारतो, 'काय महागाई झाली आहे ! कसं जगावं मध्यमवर्गीयांनी ?' एखादा म्हणतो, 'ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादात आपलं बस्तान कुठं बसवावं तेच कळत नाही.' सामाजिक नात्यांनी सगळ्यांची मने गुंफलेली असतात, संघटित झालेली असतात. समान हितसंबंधांच्या परस्परपरिचित व्यक्ती जवळजवळ बसलेल्या असतात. त्याही अर्थाने संघटना झालेली असते.

पण एकदा का गवयाने षड्ज् लावला, की सगळे रूप पालटते ! सामाजिक नाती गळून पडतात, संघटना कोलमडते. जो तो अलग अलग होतो, संघटना सोडतो आणि सूर पकडतो. सूर पकडता पकडता तो केवळ समाजच हरवून बसतो असे नव्हे तर नकळत स्वत:लाही हरवतो. शिल्लक राहतो फक्त सूर.

असे झाले म्हणजे सर्व संकेत दूर राहतात. आणि संकेत दूर राहिले म्हणजे त्या संकेतांच्या आधाराने उभा राहणारा सामाजिक संदर्भ दूर राहतो. असा सामाजिक संदर्भ नसला तर लोक जरी एकत्र असले तरी समाज म्हणून त्यांना अस्तित्त्व उरत नाही. म्हणजेच कलाकृतीच्या आस्वादनामुळे सामाजिक उत्कर्ष वा अपकर्ष घडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

याचाच अर्थ असा की कलाकृतीचा आणि समाजाचा काहीएक संबंध नसतो. कलाकृती आणि समाज यांचा संबंध नसतो ही गोष्ट इतर अनेक घटनांवरून पडताळून पाहाता येते.

## रसिकनिरपेक्षता

गायकांना त्यांचे अनुभव विचारले तर माहिती अशी मिळते की कित्येक गायक कित्येक वेळा केवळ स्वत:साठी गात असतात. उदरंभरणासाठी कधी-कधी ते आपल्या आश्रयदात्यापुढेही गात असतात. केवळ एवढ्या घटनेवरून गायनकलेचा आणि समाजाचा संबंध आहे, म्हणजेच गायक कलावंताने सामाजिक ऋण फेडले पाहिजे असे सिद्ध होत नाही. समोर बसलेल्या श्रोत्याला माझे गाणे काय समजणार अशीसुद्धा भूमिका ठेवून पुष्कळ गायक गाणे गात असतात. त्यांचे गाणे रसिकनिरपेक्ष असते. 'रसिक पुढे नसताना मी कसा गाऊ ?' हा प्रकार केव्हा आणि कसा सुरू झाला हे सांगणे कठीण आहे. पण मुख्यत्वे स्वत:साठी, केवळ स्वत:साठीच गाणारे थोरथोर गायक कलावंत होते आणि आहेत ही गोष्ट नीट समजावून घेतली पाहिजे. उदरनिर्वाहासाठी प्रथम

राजाश्रय, नंतर आकाशवाणीचा आश्रय आणि आता लोकाश्रय असा प्रवास दिसत असला तरी हा प्रवास नाकरणारेही काही कलावंत आहेत.

## रचनासौंदर्य

गायनाच्या बाबतीतील कलेची समाजनिरपेक्षता समजावून घेण्यासाठी इतकी का होईनात पण आडवळणे घ्यावी लागतात. वाद्यसंगीताच्या बाबतीत तर तेवढीही आवश्यकता नाही. गायनात कधीकधी पदाच्या किंवा चिजेच्या निमित्ताने मानवी जीवनातील भावना व्यक्त होत असतात. अशा भावना सामाजिक असल्याने गाण्याचा समाजाशी संबंध असल्याचे वादविवादात सूतोवाच करण्यास फावते. पण सतारीवरील आलाप, जोड, झाला इत्यादी प्रकार सुरू झाले म्हणजे कोणता सामाजिक संकेत वा संदर्भ रसिकांच्या मनात उभा राहातो? त्यावेळी तरी दिडदा दिडदा यांच्या विविध रचनांचे सौंदर्यच समोर असते. सामाजिक संकेत किंवा संदर्भ उभा राहण्यासाठी ज्या शब्दार्थांचे अस्तित्व आवश्यक असते ते शब्दार्थच वाद्यसंगीतात उपलब्ध होत नसल्याने सामाजिक भावभावना जागृत होण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही.

खरे म्हणजे गीतातील शब्दार्थांचे शेपूट धरून समाजाने गायन कलेच्या प्रांतात घूस मारल्याचे दिसते. म्हणजे असे की गझल, लावणी, ठुमरी, अभंग इत्यादी 'साहित्यिक संगीतात' सामाजिक आशय घुसत असतो; तो बहुधा नाट्यगीतात कमी होतो आणि ख्यालगायकीत कमीतकमी होतो. अनेक तथाकथित संगीतप्रेमी, चीजेतील शब्दांचा स्पष्ट शब्दोच्चार न करण्याबद्दल नाके मुरडतात. वस्तुतः शब्दांच्या उच्चाराकडे दुर्लक्ष करणारा गायक सुरांच्या सौंदर्याची उपासना करीत असतो, या महान गोष्टीकडे या सामाजिक संदर्भ शोधणाऱ्यांचे दुर्लक्ष झालेले असते! पण खरा कलावंत किंवा कलाप्रेमी पुन्हा उलटा प्रवास करीत जातो. म्हणजे असे की भावगीत ऐकताना एखादी हरकत ऐकली की तो सुरांच्या प्रेमात पडतो. सुरांची अधिक करामत ऐकण्यासाठी मग नाट्यगीत, नंतर गझल, ठुमरी, चीज असे करीतकरीत तो शेवटी ख्यालाकडे वळतो. आणि भावगीतातून डोकावणारा सामाजिक भावभावनांचा संसार सोडून तो माणूस स्वरांच्या सौंदर्यविश्वात रममाण होतो.

गायनकला अशा रीतीने श्रोत्याला आणि कलावंतालाही सामाजिक जबाबदारीबिबाबदारीच्या जोखडातून मोकळे करते. म्हणजे निदान गायक कलावंत तरी समाजाचे काही देणे लागत नाही हे लखलखीतपणे लक्षात घ्यायला हवे. गायनात सामाजिक संकेत वा संदर्भ जागृत होत नसल्याने समाजविषयक उपकार वा अपकार करण्याचे अंग वा सामर्थ्यच गायनकलेला चिकटवणे निष्फळ ठरते.

## साहित्यकला

जी गोष्ट, म्हणजे समाजनिरपेक्षता, गायनवादन कलेच्या बाबतीत अनुभवास येते तीच गोष्ट इतरही कलांच्या

बाबतीत थोड्याफार फरकाने आढळून येते.

'थोड्याफार फरका'ने असे थोडेसे चाचरत म्हणण्याचे कारण समजावून घेतले पाहिजे.

उदाहरणार्थ साहित्यकला घेऊ या. साहित्यकलेच्या बाबतीतच सामाजिक जबाबदारीचा फार मोठा डांगोरा सतत पिटला जात असल्याने साहित्यकलेत समाजनिरपेक्षता आहे की नाही ते नीट निरखून पाहू या.

साहित्यिकाने साहित्यरचना करताना सामाजिक जबाबदारीचे भान ठेवले पाहिजे, आपल्या कथाकादंबरीमुळे प्रचलित सामाजिक श्रद्धांचे हनन होत नाही ना, याबद्दल सावध राहिले पाहिजे, समाजातील तरुण पिढीवर आपल्या साहित्यातील एखाद्या प्रसंगामुळे अनिष्ट संस्कार होऊन त्यांचे आचरण बिघडणार नाही याबद्दल साहित्यिकाने डोळ्यात तेल घालून साहित्यरचना केली पाहिजे असा पुकारा वारंवार करण्यात येतो.

साहित्यकलेवर अशी जबाबदारी टाकली जात असली तरी प्रत्यक्षात काय दिसते? प्रत्यक्षात पाहिले तर असे दिसते की, ही जबाबदारी साहित्यकलेने वेळोवेळी झुगारून दिलेली आहे.

## स्वकीय व परकीय

'हॅम्लेट' हे आहे सातासमुद्रापलीकडील नाटक समाजाचे.असे नाटक जेव्हा सात समुद्र ओलांडून भारतात येते तेव्हा भारतीय समाजाने ते नाटक आपले म्हणून पहावे काय? सामाजिक जबाबदारीवाल्यांच्या मतानुसार पाहिले तर ते नाटक येथल्या मातीतले, येथल्या समाजातले नसल्याने त्या नाटकाला येथल्या प्रेक्षकात मुळीच स्थान मिळायला नको. पण प्रत्यक्षात मात्र ते परकीय नाटक येथल्या समाजाला स्वकीय वाटते. याचा अर्थ काय समजायचा? एक अर्थ तर स्पष्टच आहे की ते नाटक येथल्या समाजाला स्वतःचे वाटते. पण हे वाक्य थोडे दुरुस्त करायला हवे. ते नाटक येथल्या 'समाजा'ला स्वतःचे वाटत नसून येथल्या व्यक्तीव्यक्तीला स्वतःचे वाटते. आणि जरी ते नाटक वरकरणी राजपुत्राचे आणि राजघराण्यातील व्यभिचाराचे असले तरी अंतर्यामी मात्र ते नाटक एका संवेदनक्षम, पापभीरू तरुणाचे आहे. ह्याही वाक्यात पुन्हा थोडी दुरुस्ती करायला हवी. 'तरुणा'चे या शब्दाऐवजी 'व्यक्ती'चे असे म्हणायला हवे. कारण नाटकादी साहित्यकलेत जेव्हा एखादे पात्र प्रवेश करते तेव्हा त्याचा वेश जरी सामाजिक आणि कालिक असला तरी त्याचा वेध मात्र स्थलकालातीत व्यक्तित्त्वालाच होत राहतो. आणि म्हणूनच 'हॅम्लेट'मधील राजपुत्राचे प्रश्न राजपुत्राचे, सातासमुद्रापलीकडील समाजाच्या राजपुत्राचे राहत नसून ते नाटक जेथे जेथे पाहिले जात असेल तेथल्या तेथल्या माणसाचे होते. मग तो प्रेक्षक सामाजिक दृष्ट्या मराठी मातीतला असो किंवा रशियन मातीतला असो.

## अस्वस्थ चित्त

खरे म्हणजे नाटक सुरू झाले रे झाले की प्रेक्षकांमधला समाज कणाकणाने विघटित होत जातो आणि म्हणून तर 'एकच प्याला' पाहावयास गेलेला प्रेक्षक सुरुवातीस जरी समाज म्हणून एकत्रितपणे बोलणीचालणी करीत असलेला पाहावयास मिळाला, तरी नाटक पाहताना तो समाज धुक्याप्रमाणे विरून गेलेला असतो. आणि शेवटी तर, नाटक संपल्यावर जो तो अशा अस्वस्थ चित्ताने बाहेर पडतो की, तो मुळी दुसऱ्याशी सामाजिक पातळीवर बोलण्याच्या मनस्थितीतच नसतो. तो अंतर्मुख होऊन अस्तित्त्वविषयक प्रश्नांचाच विचार करू लागलेला असतो.

म्हणजेच कलाकृतीचे आवाहन समाजाला नसून सामाजिक कोषाच्या बाहेर पडलेल्या सौंदर्यशोधक व्यक्तित्त्वाला असते.

म्हणून पुन्हा एकदा हे स्पष्ट करायला हवे की साहित्यादी कलेत वरवर जरी सामाजिक प्रश्नांची चर्चा मांडणी असली तरी ते टरफल आहे याची जाणीव त्या कलेचा आस्वाद घेतानाच होत असते.

पण आमचे नीतीमार्तंड बथ्थडपणे पुन:पुन्हा नव्या नाटकाला 'समाजावर दुष्परिणाम करणारे नाटक' असे म्हणायला सरसावतात. त्यांच्या एका गैरसमजाचे सहज जाताजाता स्मरण होते. उदाहरणार्थ ते जेव्हा असे म्हणतात की 'सखाराम बाइंडर'मुळे समाजातील तरुण मुलांवर वाईट संस्कार होतात, तेव्हा त्यांना असे विचारावेसे वाटते की, 'मृच्छकटिक' हे नाटक पाहिल्यामुळे कोणते संस्कार होत असतील? ते नाटक पाहून गावातल्या नवविवाहित सवत्स पित्यांनी चारुदत्ताचे अनुकरण करून वेश्यांवर प्रेम करावे काय? आणि त्या वेश्येला घेऊन संभाजी उद्यानात आलिंगने द्यावीत काय?' पण असले प्रश्न विचारले की नीतीमार्तंड लोक काळाचा प्रश्न उपस्थित करून मृच्छकटिक वेगळ्या काळातले होते वगैरे बोलू लागतात. नाटकातला नायक काय करतो वगैरे पेक्षा तो कशासाठी करतो आणि त्या करण्याचे काय होते याच्या मांडणीकडेच रसिकाचे लक्ष असते. तसे लक्ष नसेल तो प्रेक्षक बिघडण्यासाठी 'सखाराम बाइंडर' पाहण्याची वाट न पाहता 'महाभारत' वाचून दु:शासन बनून गल्लोगल्ली द्रौपदीवस्त्रहरणाचे प्रयोग करीत सुटेल.

थोडक्यात म्हणजे साहित्यात असलेल्या शब्द आणि अर्थ यामुळे वरवर जरी सामाजिक संदर्भांची जाणीव होत असली तरी अंतर्यामी मात्र व्यक्तित्त्वाच्या अस्तित्त्वविषयक प्रश्नांच्या मांडणीचेच चिंतन करीत असतो. आणि म्हणूनच कलाकृतीचा आणि समाजाचा संबंध नसतो असे जे संगीत कलेसारख्या विशुद्ध कलेच्या बाबतीत सहजपणे अनुभवास येते तेच साहित्यादि कलांमध्येही प्रत्ययास येते.

● ● ●

# ग्रामायन

## दिनांक बारा आणि तेरा जानेवारी

श्री. ग. मा.

दिनांक १२ आणि १३ जानेवारी. पुण्यातील एका कार्यालयात ग्रामीण भागातील काही कार्यकर्ते व या कार्यकर्त्यांशी व त्यांच्या कार्याशी जवळचा संबंध असणारे काही शहरी सुशिक्षित एकत्र जमले होते. हेतू हा, की ही ठिकठिकाणी विखुरलेली कार्ये व माणसे एकमेकांना परिचित व्हावीत, यातून अनुभवांची देवाणघेवाण वाढावी, आवश्यकता वाटल्यास हे संबंध अधिक दृढ करण्यासाठी एखादी मध्यवर्ती संस्था चालू व्हावी. पूर्ण चोवीस तास ही सर्व मंडळी एकत्र राहिली, जेवली. एकूण तीन सत्रे झाली. पहिल्या सत्रात आपापल्या कार्यक्षेत्राची ओळख; दुसऱ्या सत्रात मध्यवर्ती केंद्राच्या स्वरूपाबावत चर्चा; तिसरे सत्र पुढील कार्यक्रमाची रूपरेषा. पहिले सत्र फारच रंगले. रात्री ११ वाजेपर्यंत हे चालू होते. हे सत्र संपल्यावर निरीक्षक म्हणून आलेले डॉ. विद्याधर पुंडलीक व कादंबरीकार श्री. ज. जोशी हे सहज जाताजाता म्हणाले: We are truly informed. हे सगळं नवीन वाटलं आम्हाला, हे सगळं प्रत्यक्ष जाऊन पाहायला हवं.

या सत्राचा शेवट मिरजेजवळील म्हैसाळ प्रयोगाचे प्रवर्तक मधुकर देवल यांनी केला होता. प्रयोगाची सुरुवातीपासूनची माहिती, आजवरची वाटचाल, यशापयश त्यांनी निरहंकार वृत्तीने सांगितले. अखेरीस ते म्हणाले: आज म्हैसाळ गावातले इतर लोकही हरिजनांच्या या प्रयोगाकडे आकृष्ट झालेले आहेत. पूर्वीचा विरोध हळुहळू मावळत आहे. लोक असे म्हणू लागले आहेत, की ही हरिजनमंडळी सचोटीची आहेत, प्रामाणिक आहेत. दक्षिणेकडे गावातल्या चांगल्या वस्तीला 'अग्रहार' असे म्हटले जाते. आमचे असे स्वप्न आहे, की आम्ही काम करतो तो हरिजनवाडा म्हैसाळातला 'अग्रहार' बनावा. सचोटीचे, प्रामाणिकपणाचे, सुधारणेचे, समतेचे नवे आदर्श या अग्रहाराने गावासमोर ठेवावेत. हरिजनांचा आर्थिक विकास तर चालूच आहे. लवकरच आम्ही याबाबतीत स्वयंपूर्ण होऊ. सर्व कर्ज फेडून टाकू. हे आता अवघड राहिलेले नाही. एवढा दुष्काळ महा-

राष्ट्रभर पडला. पण आम्ही अभिमानाने सांगू शकतो, की आमच्या सहकारी शेतीसंस्थेत सामील झालेला एकही हरिजन माणूस किंवा त्याची बायकामुले उपाशी राहिली नाहीत. आम्ही सर्वांना काम आणि दाम पुरवू शकलो. पण एवढयावर आमचे आता समाधान नाही. हरिजन बांधवांचा नैतिक व सांस्कृतिक विकासही घडून यायला हवा. त्यांची आत्मप्रतिष्ठा वाढायला हवी. गावात सर्वत्र त्यांना मान आणि समानतेची वागणूक मिळायला हवी. आमच्या संस्थेतील कार्यकर्ते गावातल्या इतर गरजू व लहान शेतकऱ्यांची, म्हाताऱ्या कोताऱ्या अनाथ लोकांची अडलेली कामेही करून देतात. यामुळे वातावरणात खूप फरक पडलेला आहे. एक विश्वासाचे ठिकाण म्हणून या संस्थेकडे आसपासच्या गावातूनही लोक येत आहेत, आम्हाला आणखी कार्यकर्ते हवेत, त्यांची सर्व सोय आम्ही करू ... गावोगाव असे अग्रहार निर्माण व्हायला हवेत......

हा सांस्कृतिक विकासाचा मुद्दा देवलांपूर्वी मळवलीचे श्रीराम चिचलीकर यांनी उपस्थित केला होता. चिचलीकर गेली आठदहा वर्षे मावळ भागात सर्वोदयाचे काम करीत आहेत. या भागातील लहान शेतकऱ्याला शेतीचे नवे तंत्र शिकवण्यापासून त्यांनी आपल्या कामाला प्रारंभ केला. त्यामुळे शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ झाली. पण हा वाढावा खर्च कशात झाला ? चिचलीकरांच्या सांगण्याप्रमाणे शिक्षण व घरदार यापेक्षाही अधिक भाग यात्रा, लग्नसमारंभ, निवडणुका, दारू यात खर्च झाला. शिवाय आपल्यापेक्षाही गरीब, अडचणीत सापडलेल्या शेजाऱ्याच्या जमिनी गिळंकृत करण्याचे प्रकारही खूप झाले. यामुळे चिचलीकरांना आपल्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमातील अपुरेपणा, एकांगीपणा फार तीव्रतेने जाणवू लागला व त्यांनी आपल्या कामाची दिशाच बदलून टाकली. हल्ली तर गीताई प्रचार हा त्यांचा मुख्य कार्यक्रम होऊन बसला आहे.

-पालघर तालुक्यातील दार्माखिड कोंठाण या आदिवासी विभागात कार्य करणारे आबा करमरकर यांचा दृष्टिकोन थोडा वेगळा दिसला. संस्कृती, नैतिकता हे शब्द त्यांच्या निवेदनात डोकावले नाहीत. त्यांचा सारा भर सत्य, शिस्त आणि शास्त्र यावर होता. विकासासाठी सरकारी यंत्रणेकडून, बँकांकडून मदत मिळविता येते, मिळविली पाहिजे हे त्यांनी सांगितले. पण यासाठी भ्रष्टाचार करावा लागत असेल तर वेळप्रसंगी मदतीवर लाथही मारली पाहिजे, काम खोळंबले तरी हरकत नाही, अशी त्यांची कणखर भूमिका होती. ही घेतलेली मदत परत फेडण्याचे वळणही मदत घेणाऱ्याला लावायला हवे असे त्यांनी आवर्जून सांगितले. कर्जे ही परत करायची असतात, बुडवायची नसतात हे आबांच्या प्रयोगातील एक सूत्रच आहे. देवलांच्या प्रयोगात सहकारी शेतीवर

भर आहे तर लहान शेतकरी आधुनिक शेतीतंत्राच्या सहाय्याने समर्थ बनविणे, या शेतकऱ्याच्या २।४ एकर तुकड्यातूनच विकासासाठी अवश्य असलेले भांडवल व वाढावा (Sur plus) निर्माण करणे ही आबांच्या प्रयत्नांची दिशा आहे. या पहिल्या सत्राचा समारोप करताना मुंबई विद्यापीठातील शेती अर्थशास्त्राचे प्राध्यापक स. ह. देशपांडे यांनी हा फरक स्पष्ट केला व आबांचा प्रयत्न मनुष्यस्वभावाला धरून व अधिक प्रातिनिधिक असल्याचे आपले मत नोंदविले.

पुण्याजवळील हडपसर येथे समाजवादी मंडळींनी पूर्वी सुभाष सहकारी शेतीचा एक प्रयोग केलेला होता. तो टिकला नाही, कारण ध्येयवादी कार्यकर्ते पुरेशा प्रमाणात मिळाले नाहीत. मुख्य प्रवर्तक दूर झाल्यावर स्वार्थ प्रबळ झाला व प्रयोगाची वाताहात झाली–हा दाखला देऊन देशपांडे यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, देवलांनंतर म्हैसाळ प्रयोगाचे असेच काही होणार नाही कशावरून ? देवलांसारखे त्यागी व पूर्ण वेळ समाजासाठी वेचणारे कार्यकर्ते नेहमीच कमी असणार. आपल्यापुरते पाहणाऱ्यांची संख्याच नेहमी समाजात अधिक असते. तेव्हा कार्याची उभारणी ही सर्वसामान्य मनुष्यप्रवृत्ती गृहीत धरून करावी, की न पेलणाऱ्या आदर्शांचा आग्रह धरावा? या प्रश्नाचे निर्णायक उत्तर देशपांडे यांनीही दिले नाही. पण त्यांचा कल पहिल्या पर्यायाकडे अधिक दिसला.

एक गंमत सहज जाणवली. आबा समाजवादी पक्षाचे एके काळचे पूर्ण वेळ कार्यकर्ते. पण त्यांचा प्रयोग जमिनीच्या खाजगी मालकीवर आधारलेला; म्हणजे चालू समाजवादी विचारप्रवाहाच्या उलट दिशेने निघालेला. देवल एके काळचे रा. स्व. संघाचे प्रचारक. त्यांची वाटचाल सुरू आहे मात्र सामुदायिक शेतीकडे ! व्यक्ती तितक्या प्रकृती हेच शेवटी आपल्याकडे तरी खरे दिसते आहे !

आबांच्या कार्यस्थळापासून जवळच असलेल्या तळासरी भागातील सूत्रकार येथील महाराष्ट्र गोपालन समितीच्या प्रयोगाची माहिती श्री. पाटणकर यांनी सांगितली. परंतु हा प्रयोग अजून बाल्यावस्थेत आहे, शिवाय त्यातील समाजपरिवर्तनाचा दृष्टिकोनही अद्याप पुरेसा स्पष्ट नाही. त्यामुळे या प्रयोगावर फारशी चर्चा होऊ शकली नाही.

देवल-करमरकरांची मुख्य प्रेरणा आर्थिक विकासाची, सूत्रकारची धार्मिक तर शिरूर आणि दारफळ येथील कार्याची उभारणी बरीचशी राजकीय स्वरुपाची. दारफळ हे पन्नालाल सुराणांचे कार्यक्षेत्र. येथील कार्यकर्ते श्री. शिंदे व नूलकर काही विशिष्ट अपेक्षा बाळगून ळाव्याला एवढ्या लांबून आले होते व निघताना या आपल्या अपेक्षा पूर्ण झाल्या असे सांगून वर्षातून निदान एकदा तरी असे अनौपचारिकरीत्या जमावे असे त्यांनी सुचविले. दारफळला शिंद्यांनी व त्यांच्या तरुण सहकाऱ्यांनी गावातील ग्रामपंचायत,

सोसायटी इत्यादी पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या संस्थाच जुन्या, भ्रष्ट लोकांकडून लोकशाही मार्गाने हिसकावून घेतल्या व ही सर्व यंत्रणा साफसूफ करून गावच्या विकासासाठी राबविली. शाळा, पाझर तलाव, खत-बीबियाण्यांचे वाटप, पडिक जमिनींची मशागत इत्यादी विकास कार्यक्रम त्यांनी यशस्वीरीत्या या यंत्रणेद्वारे आजवर पार पाडलेले आहेत. धान्य-बँकेचा एक प्रयोगही येथे सुरू आहे. निवडणुकीच्या राजकारणापासून ही मंडळी अलिप्त नाहीत. पण यामुळे विकासकार्याला खीळ बसली आहे असाही त्यांचा अनुभव नाही. सत्तारूढ काँग्रेसपक्षाशी विरोध असला तरी काही सरकारी अधिकारी सहानुभूती बाळगणारे निघाले; त्यामुळे कामे होत राहिली, विकास खोळंबला नाही. हे काम आता आसपासच्या दहा-पाच गावातही फैलावत आहे.

संघर्ष आणि रचना यांची अशीच एक सांगड शिरूरच्या कामात दिसली. या कामाची माहिती बाबुराव दौंडकर व बिंदुमाधव जोशी या दोघांनी दिली. बिंदुमाधव हे जनसंघाचे कार्यकर्ते. पुण्यातील युवक चळवळीशी त्यांचा घनिष्ट संबंध. बाबुराव दौंडकर हे शिरूर तालुक्यातील एक नामवंत लोकप्रतिनिधी. दुष्काळानिमित्त या दोन व्यक्ती एकत्रित आल्या आणि जिवापाड काम करून त्यांनी शिरूर तालुका या संकटातून अक्षरशः ओढून वर काढला. दुष्काळी कामे शासनाला काढायला लावली. ती व्यवस्थित पार पाडली जातात की नाही यावर सक्त नजर ठेवली. दुष्काळी मजुरांचे पगारवाटपाचे प्रश्न धसाला लावले. यासाठी उपोषणे, मोर्चे, सभा, निदर्शने यांचे तालुकाभर रान उठवून दिले. दुष्काळ संपल्यावर एक शेतकरी मंडळ या भागात स्थापन करून त्याद्वारे येथील विकासाची पुढची कामे हाती घ्यावीत असा या मंडळींचा प्रयत्न आहे. सध्या हाती घेतलेले काम एक धान्यबँक हे आहे. या भागातील बहुसंख्य तरुणवर्ग शहराकडे खेचला गेलेला आहे, गावे उजाड वाटतात, यासाठी एखादा उद्योगधंदा या भागात निघणे अवश्य आहे हे बिंदुमाधवांचे प्रतिपादन; तर बाबुराव दौंडकरांचे म्हणणे आजच्या या भागातला प्रश्न शेतकऱ्यांची कर्जे माफ कशी होतील हे पाहण्याचा आहे. या तालुक्यातून चार नद्या वाहतात, तरी हा तालुका गेली वीस वर्षे दुष्काळात का रखडावा याचा तज्ज्ञांनी विचार करावयाचा आहे. पुण्यासारख्या पुढारलेल्या शहरापासून अवघ्या वीस मैलांवर एवढा सततचा दुष्काळ, एवढा मागासलेपणा राहावा याची पुण्यातील सुशिक्षितांनाही काही खंत वाटायला हवी, हेही उपस्थितांना सुनवायला बाबुरावांनी कमी केले नाही. गोखले इन्स्टिटयुटचे प्रा. शरद कुलकर्णी समोर होतेच. त्यांनी दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नात लक्ष घालण्याचे आश्वासन बाबुराव दौंडकरांना तिथल्या तिथेच दिले, त्यासाठी सुखठणकर अहवालाचा

आधार आहे हेही सांगितले. असे आडवे तिडवे धागे मेळाव्यामध्ये अनेक विणले गेले, परस्पर देवाणघेवाण खूप झाली. याच अर्थाने दारफळच्या शिंदे-नूलकरांनी मेळावा यशस्वी झाला अशी पावती दिली होती—कारण त्यांनी आबा करमरकरांशी पुढचे संधान या मेळाव्यातच बांधून घेतलेले होते.

सर्वोदयाचे प्रतिनिधित्व गोविंदराव शिंदे यांनी केले. महाराष्ट्राच्या दोन टोकाला आज ते काम करीत आहेत. शहादे आणि रत्नागिरी जिल्ह्यातील अप्पासाहेब पटवर्धनांचे गोपुरी. शहाद्याला सर्वोदयाने संघर्षात्मक पवित्रा घेतला—आदिवासींच्या जमिनी सावकाराकडून परत मिळविल्या. पडिक सरकारी जंगल जमिनी आदिवासींना मिळाव्यात म्हणून सत्याग्रह केले. या कामी मुंबई-पुण्याहून आलेल्या तरुण मार्क्सवादी कार्यकर्त्यांच्या सहभागाचा, कर्तृत्वाचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. गोपुरीच्या गुरुकुलकार्याची थोडक्यात माहिती देऊन शिक्षित, श्रमाची आवड व सवय असलेले कार्यकर्ते मिळत नाहीत ही मुख्य अडचण म्हणून सांगितली. मेळाव्याला हजर असलेले माणूसचे एक लेखक चंद्रशेखर मराठे यांनी गोपुरीच्या या प्रयोगात बराच रस घेतला. गोपुरी-म्हैसाळ असा सांधा जमला तर पहावा या दृष्टीनेही काही बोलणी झाली. लवकरच अण्णासाहेब सहस्रबुद्धे, गोविंदराव शिंदे व गोपुरीची इतर काही मंडळी म्हैसाळला भेट देणार आहेत.

संस्थात्मक नाही, पण व्यक्तिगत पातळीवर सर्वोदयाचे प्रतिनिधीत्त्व आणखी एका गृहस्थांनी केले. खानापूरचे डॉ. मोडक यांनी गेली पंचवीस-तीस वर्षे आपला व्यवसाय सांभाळून या भागात ते ग्रामीण विकासाचे कार्य करीत आहेत. शाळा, रस्ता, पिण्याचे पाणी यापलीकडे जाऊन सिंहगडच्या तळचे सर्व मोसे खोरे हाच विकासाचा एक घटक कल्पून काम केले पाहिजे हा विचार अलिकडे ते वरचेवर मांडीत आहेत व त्यादृष्टीने त्यांचे प्रयत्नही सुरू आहेत. नुकतेच डॉ. मोडक युरोपचा दौरा करून आलेले आहेत. या दौऱ्यात त्यांनी फ्रान्स, जर्मनी, स्कॅंडिनेव्हिअन देश यामधील जंगल शेती प्रयोगांची विशेष आस्थेने पाहणी केली. हा जंगलशेतीचा दृष्टिकोन या खोऱ्याच्या विकासाला उपयुक्त ठरेल, त्यादृष्टीने या खोऱ्याची शास्त्रीय पाहणी व्हावी, भावी योजना आखल्या जाव्यात असे डॉक्टरांनी आग्रहपूर्वक सुचविले.

मोसेखोऱ्यालगतच्या शिवगंगा खोऱ्यात पुण्याची ज्ञानप्रबोधिनी ठाण मांडून बसली आहे. या संपूर्ण खोऱ्याचा विकास करण्याची महत्त्वाकांक्षी योजना संस्थेच्या डोळ्यासमोर आहे. सुरुवात झाली एक लहानसा बंधारा बांधण्यापासून. मग ट्रॅक्टर सर्विस सेंटर आले. दुष्काळात वनविकासाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. खेडशिवापूरला एक यंत्रशाळा सुरू आहे. याठिकाणी आसपासच्या गावातून तरुण कामासाठी येतात व संस्थेच्या विकासकल्पनांचे


डोळे झांकले
तरी चव
कांहीं
लपत
नाहीं !
heros' SBC-50E MAR
ताजी, कुरकुरीत व रुचीला आगळीच —
वा! ही तर
साठे माल्टेक्स बिस्किटेच!
ही आगळी वेगळी रुचिसंपन्नता
माल्टमुळेंच या बिस्किटांत आहे.
पचायला हलकी व भरपूर पोषक द्रव्यें
असलेली माल्टेक्स बिस्किटें कितीही
खा पुन्हा पुन्हा खावीशी वाटतात
ती या माल्टमुळेच!
आजच खरेदी करा अन्
फरक पहा जरा!
साठे माल्टेक्स बिस्कुट
SATHE MALTex BISCUITS
SATHE MALTex BISCUITS
साठे
बिस्किटे

लोण आपापल्या गावात घेऊन जातात. ही यंत्रशाळा-कारखाना पुण्याच्या मोठ्या कारखान्यांना छोटे छोटे, सुटे यंत्रभाग पुरवितो. हा खेडशिवापूरचा कारखाना वाढवावा, हजारो कामगारांना या ठिकाणी एकत्र काम पुरवावे अशी संस्थाचालकांची ईर्षा नाही. शक्यतो विकेंद्रिकरण साधावे असा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांच्या घरात, झोपडीत, गावागावातून सुटे सुटे यंत्रभाग बनविण्याचे काम विखुरले जावे, या भागात वीज पोचली असल्याने शेतकऱ्याला घरच्या घरीच जोडधंदा करता यावा हा संस्थाचालकांचा दृष्टिकोन आहे व सर्वांनाच तो विचारार्ह व वैशिष्ट्यपूर्ण वाटला. प्रा. स. ह. देशपांडे यांनी आपल्या भाषणात या उपक्रमाचे वैशिष्टच नेमके टिपले व आबा करमरकरांप्रमाणेच याही प्रयोगाचे अधिक खोलात जाऊन परीक्षण केले पाहिजे असे सांगितले. मेळाव्याला संस्थेतर्फे श्री. लेले उपस्थित होते व त्यांनी अवश्य तो तपशील पुरवला. पुढील सर्व चर्चेतही आपुलकीने भाग घेतला.

येथवर आपण असे म्हणू शकतो, की एखाद्या विशिष्ट विचारसरणीचा-संप्रदायाचा ठसा असलेल्या मंडळींकडून आपापल्या कामाची ओळख करून दिली गेली. नाही म्हटले तरी देवलांचा पिंड रा. स्व. संघाने घडविला, आबा करमरकरांनी पक्षमुक्ती सांगितली तरी समाजवादी पक्षाचे व त्यांचे नाते तुटणे शक्य नाही. ज्ञानप्रबोधिनी, सर्वोदय यांचा ठसा तर स्पष्टच आहे. पण या सर्वांहून वेगळे, कुठल्याही विचारसंप्रदायाचा Ideology चा टिळा नसलेले निर्भेळ समाजसेवाकार्य म्हणजे डॉ.अच्युतराव आपटे यांचे; पुण्यातील विद्यार्थी साहय्यक समितीचे. समितीचे मुख्य काम ग्रामीण भागातून पुण्यात आलेल्या गरीब विद्यार्थ्यांची अगदी अल्पकिंमतीत जेवण व राहण्याची व्यवस्था करणे हे आहे. या कार्याची माहिती संस्थेच्या वतीने सौ. निर्मला पुरंदरे यांनी दिली. मागासलेल्या भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आता भरपूर आहे, पण विद्यार्थिनींचे प्रमाण मात्र फार कमी आहे, तेव्हा आपापल्या कार्यक्षेत्रातून विद्यार्थिनी पाठविण्याची खटपट मेळाव्याला जमलेल्या कार्यकर्त्यांनी करावी अशी त्यांची सूचना होती. संस्थेची माहिती असलेली पत्रकेच त्यांनी प्रत्येकाला दिल्यामुळे भाषणाचा प्रपंच त्यांना किंवा अच्युतरावांना फारसा करावाच लागला नाही.

□

दुसरे सत्र महाराष्ट्र टाईम्सचे श्री. दि. वि. गोखले यांनी चालविले. म्हैसाळच्या प्रयोगात गोखले यांचा वाटा महत्त्वाचा आहे. प्रयोग अडचणीत असताना त्यासाठी बाहेरून आर्थिक मदत जमविणे, प्रयोगाची सर्वांना माहिती देणे, वृत्तपत्रातून, बैठकीतून प्रयोगाचे वेळोवेळी निरीक्षण-परीक्षण चालू ठेवणे या स्वरूपात हा वाटा त्यांनी आजवर उचललेला आहे. हे काम करीत असतानाच त्यांना एखाद्या मध्यवर्ती संस्थेची

निकड जाणवू लागली. देवलांनी आता म्हैसाळातून हळूहळू मुक्त व्हावे, इतर ठिकाणी कार्यविस्तार करावा असाही त्यांचा आग्रह आहे. हे व्हायचे तर अशा स्वरूपाच्या ठिकठिकाणच्या कामाची माहिती असणे, ही ठिकाणे एकमेकांशी जोडली जाणे, देवाणघेवाणीचा प्रवाह सुरू करणे हे ओघाने आलेच. म्हणून दुसऱ्या सभेत त्यांनी ही सर्व पार्श्वभूमी सांगितली व ठिकठिकाणच्या प्रयोगांवर, ते करणाऱ्या स्थानिक संस्थांवर--व्यक्तीवर कसलेही बंधन न लादता काम करणारी एखादी मध्यवर्ती संस्था असावी काय याबाबत सर्वांनी विचार करावा असे सुचविले. आदल्या दिवशी झालेल्या 'संघर्ष की रचना' या चर्चेचा उल्लेख करून त्यांनी सांगितले: ज्याला संघर्ष करायचा आहे तो कुणाच्या परवानगीची वाट पहात नसतो. शहाद्याला संघर्षाशिवाय पर्याय नव्हता म्हणून सर्वोदयी मंडळीही तेथे संघर्षात उतरली. पण इतर ठिकाणची परिस्थिती वेगळी असू शकते. कार्यकर्त्यांची स्वभावप्रकृतीही भिन्नभिन्न असते. म्हणून रचना की संघर्ष याबद्दल एकच ठाम भूमिका घेऊन चालणार नाही. स्थानिक परिस्थितीप्रमाणे ठिकठिकाणच्या कामाचा ढाचाही वेगवेगळा राहणार. हे सर्व स्वातंत्र्य, वैविध्य गृहीत धरले तरी काही किमान भूमिकेवर सर्वांना एकत्र यायला हरकत नाही. अशा एकत्रित येण्याने अनुभवांची, विचारांची, मदतीची देवाणघेवाण व्हायला मदत होते. यासाठी एखादे मध्यवर्ती ठिकाण असलेले चांगले एवढेच मला सुचवायचे आहे...

दारफळचा अपवाद वगळता बहुतेकांनी गोखल्यांच्या सूचनेला दुजोरा दिला. दारफळकरांचे मत मात्र चालू मेळाव्यासारखे अनौपचारिक कार्यक्रम अधूनमधून करण्यापलिकडे अधिक काही करू नये असे दिसले. पण दारफळ हा अपवाद ठरला. अतिव्याप्ती किंवा अव्याप्ती ही दोन्ही टोके टाळून संस्थेची मांडणी व्हावी अशी डॉ. अच्युतराव आपटे यांनी एक बारीकशी सूचना केली. ती सर्वांना मान्य झाली व गोखल्यांना हवा होता तो हिरवा कंदिल दिला गेला.
¤

शेवटचे सत्र मेळाव्यानंतर लगेच-काय, हे ठरविण्यासाठी होते. एखाद्या प्रकल्पाच्या ठिकाणी तरुणांचे शिबिर पुढच्या सुट्टीत प्रथम घ्यावे असे ठरले. याबाबतचा तपशील ठरविण्यासाठी व संकल्पित मध्यवर्ती संस्थेचे नाव, घटना इत्यादी भाग नक्की करण्यासाठी एक हंगामी समिती मेळाव्याला उपस्थित असणाऱ्यांमधून निवडली गेली व या समितीने पुढचे सर्व निर्णय घ्यावेत असे ठरविण्यात आले. पुण्याच्या गरवारे कॉलेजचे प्राध्यापक व्ही. डी. देशपांड (अर्थशास्त्र) हे या समितीचे अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले.
¤

भा. कृ. केळकर (दिल्ली) यांनी एकूण मेळाव्याचा समारोप केला. ही कल्पना निघाली कशी, यामागील भूमिका कोणती हे त्यांनी स्पष्ट केले. निमंत्रणासोबत एक मसूदा सुरूवातीलाच

विचारार्थ सर्व ठिकाणी पाठविण्यात आलेला होता. हा मसुदा भा. कृ. केळकरांनीच तयार केलेला होता. त्यामुळे समारोपात मसुद्यातील महत्त्वाचा भाग त्यांनी सांगितलाच, शिवाय चालू राजकीय अस्थिरतेचे, आपल्या भयाण व भेसूर आर्थिक अवनतीचे सोदाहरण विवेचनही केले. मसुद्यात भा. कृं. नी म्हटले होते—

स्वयंप्रेरित ग्रामविकासाचा हा एक संकल्प आहे...

भारताच्या विकासाचा योजनाबद्ध सामूहिक प्रयत्न १९५० मध्ये सुरू झाला. त्यातून जे घडावयास हवे होते ते घडलेले नाही, हे सध्याच्या आपल्या भीषण आर्थिक स्थितीवरून स्पष्ट झाले आहे. कारणे अनेक आहेत, पण मुख्यत: आपण या देशाच्या परिस्थितीला साजेशी अशी पुनर्रचनेची आखणी केली नाही. या देशाच्या मुख्य प्रश्नांचा विसर पडला; किंवा त्याकडे कमी लक्ष दिले गेले आणि संपन्न राष्ट्रांचे अनुकरण करण्यात पैसा व वेळ खर्च केला. त्यामुळे ग्रामीण दारिद्र्याचा प्रश्न आपण परिणामकारकरीत्या हाताळू शकलो नाही. इतकेच नव्हे तर आपल्या नियोजनातून जे अफाट नागरीकरण झाले त्याचे आर्थिक सामाजिक दुष्परिणाम आपण आज भोगतो आहोत. तेव्हा आज परिस्थिती अशी आहे की, आपण जाणीवपूर्वक आपला मार्ग बदलला नाही तर आर्थिक बेबंदशाही आणि त्यातून राजकीय हुकूमशाही वा विनाश ओढवेल. भूकग्रस्त ग्रामीण समाज आणि वैभवसंपन्न नागरी समाज अशी या देशातील जनतेची विभागणी होईल आणि त्यातून दोन भिन्न जीवनप्रवाह चालू राहतील. त्यांच्यात वितुष्ट येणे, संघर्ष होणे अपरिहार्य आहे. म्हणून आज तातडीने ग्रामीण पुनर्रचनेच्या प्रश्नांचा एकात्म व एकसूत्री विचार करणे त्यासाठी आवश्यक ते सामाजिक वातावरण निर्माण करणे व त्या दिशेने आपल्या आर्थिक नियोजनाची पुन्हा मांडणी करणे आवश्यक आहे.

हे कार्य राष्ट्रीय पातळीवर एकदम होणार नाही. नवे राष्ट्रीय नेतृत्व उदयाला आल्यावर राष्ट्रीय उत्थान घडेल ही वेडी आशा आपण सोडली पाहिजे आणि स्थानिक प्रकल्पाभोवती स्थानिक नेतृत्वाची उभारणी करण्याचा मार्गास लागले पाहिजे. ही स्थानिक नेतृत्वाची उभारणी केली तरच लोकशाही नियोजनाला लागणारी आज्ञाधारक साखळी व स्वयंस्फूर्त प्रयत्नांना आवश्यक असणारा अवसर या दोहोंचा मिलाफ घडेल आणि आपली लोकशाही ही केवळ प्रातिनिधिक न राहता जबाबदार व जनतेला विकासकार्यात सहभागी करून घेणारी सत्तायंत्रणा ठरेल. खऱ्या अर्थाने सत्ता समाजाकडे जाईल. राजकीय ठेकेदारी नाहीशी होऊन नवे सामाजिक, विधायक व झुंजार नेतृत्व निर्माण होईल. सारांश, दारिद्र्याचे भान असलेला नवा आर्थिक विचार, तो विचार अमलात आणण्यासाठी सद्य:स्थितीची शास्त्रोक्त पहाणी करून तयार केलेली ग्रामीण विकासाची

योजना, तो विचार व ती योजना याबद्दल नागरी व ग्रामीण समाजात सहानुभूती व सहकार्याची सिद्धता, नव्या दमाचे, नव्या संकल्पनेचे, निश्चयी, व्रतनिष्ठ, स्थानिक नेतृत्व आणि या सर्वांना एका सूत्रात, एका चौकटीत बसविणारी राष्ट्रीय पातळीवरील ग्रामीण दारिद्र्य निर्मूलनाचा, ग्रामीण पुनर्रचनेचा, ग्रामीण सहयोगाचा सतत विचार करणारी निःस्पृह कार्यकर्त्यांची राष्ट्रीय संस्था या सर्वांची आज निकड आहे...

□

ही निकड भागविणे हा 'ग्रामायन' चा उद्देश आहे.

लोणावळ्याला एक-दोन वर्षापूर्वी रचनात्मक कार्यात रस घेणारी अशीच काही मंडळी एकत्रित जमली होती. तेव्हापासून ग्रामायनची वाटचाल तशी सुरूच आहे. १२-१३ जानेवारीच्या मेळाव्यानंतर आता ही कल्पना अधिक स्पष्ट होत आहे. तिला संस्थेचा थोडाफार आकार प्राप्त होत आहे. हा संस्थात्मक आकारही तसा तात्पुरता व अगदी गरजेपुरताच तूर्त स्पष्ट केलेला आहे. कारण नवीन व्यक्ती येतील, नवीन प्रश्न उपस्थित होतील, नवीन कार्यक्रम निघतील तसतसा हा आकार बदलेल हे उघड आहे. बदलू नये ती मूळ प्रवृत्ती–जी भारतीय नियोजनाचा मध्यबिंदू खेडेगावात हवा असा आग्रह धरते. जुनी खेडी आजतर जवळ जवळ मोडली, संपली. पश्चिमेकडून आलेल्या व्यापारी संस्कृतीने ती उध्वस्त व उजाड करून टाकलेली आहेत. तेव्हा मामुली सुधारणावाद, पुनरुज्जीवनाची दृष्टी आता कालबाह्यच समजली पाहिजे. नवीन खेडी यापुढे वसवावी लागतील ज्यात जुन्या रचनेमागील तत्त्व फक्त गृहीत धरलेले असेल. हे तत्त्व आहे स्वावलंबनाचे, स्वयंपूर्ण, आत्मनिर्भरतेचे. मग त्याला कुणी सोव्हिएटस म्हणो, की कुणी कम्युन्स म्हणो, कुणी किबुत्स म्हणो की कुणी ग्रामस्वराज्य म्हणो. आपला कारभार आपण करणारा, गरजेच्या वस्तूंसाठी बाहेरच्या जगावर फारसा अवलंबून नसणारा, स्वावलंबी, विकेंद्रित मानवसमाज–प्राचीन काळापासून चालत आलेला हा भारतीय आदर्श, ही पौर्वात्य जीवनपद्धती! हिचा शोध आता नव्याने पुन्हा घ्यायचा आहे. सर्वांना तो आज नाही उद्या घ्यावाच लागणार आहे. त्याशिवाय आजची दैना आणि दाणादाण संपणार नाही. मग कितीही पंचवार्षिक योजना आखल्या जावोत, कितीही परकीय मदत ओतली जावो–यातून देश एका नव्या आर्थिक पारतंत्र्यात अडकल्याशिवाय राहणार नाही. नियोजनाची दिशाच बदलण्याचा हा प्रश्न आहे. विकासाचे नवे आकृतीबंधच तयार व्हायला हवेत. ते आपले आपणास हुडकायचे असतात, घडवायचे असतात. नवनिर्माण याचा हा खरा अर्थ आहे. ग्रामायनातून-गावाकडे निघालेल्या या यात्रेतून हा अर्थ अधिकाधिक स्पष्ट होत राहावा असा प्रयत्न आहे. तूर्त तरी यात्रेने एक पुढचा टप्पा गाठला आहे. यात्राच ती. अशीच पुढे पुढे ती सरकत राहणार... राहिली पाहिजे. ● ● ●

# चिअर्स... डॉ. श्रीराम लागू !

वि. भा. देशपांडे

डॉक्टर, भारत सरकारनं तुम्हांला 'पद्मश्री' किताब देऊन तुमचा बहुमान केला. आनंद वाटला. कोणाही नाट्यप्रेमिकाला आनंद वाटावा अशीच घटना. माणसाच्या कर्तृत्वाचं मोजमाप पदव्यांच्या आधारानं करण्याची आपली समाजरीत. त्यामुळं ती पदवी मिळणं मोलाचं वाटतं ! ...

...पण खरं सांगायचं तर तुम्ही नाट्यक्षेत्रात नट म्हणून श्रेष्ठ दर्जाचे आहात, हे केव्हाच सिद्ध झालंय. तुम्ही लोकमान्य तर आहातच पण आता 'राजमान्य' झालात. 'वेड्याचे घर' मधील 'दादा' पासून 'रावजगदेवराव मार्तंड' पर्यंत तुमचा सारा नाट्यप्रवास डोळ्यासमोर लख्ख दिसतो आहे. या प्रवासात गिरीश कर्नाडांचा 'ययाति' आहे, खानोलकरांचा 'गुरूमहाराज' आहे, 'यशोदा'तील 'अण्णाखोत' आहे, 'इथे ओशाळला मृत्यू'तील संभाजी आहे, 'गिधाडे'तील 'रमाकांत' आहे, 'नटसम्राट'मधील 'गणपतराव बेलवलकर' आहे, 'हिमालयाच्या सावली'तील 'गुंडो गणेश' आहे, 'गार्बो'तील 'इंटुक' आहे. जुन्या स्मृतीतील 'उद्याचा संसार' 'जगन्नाथाचा रथ', 'एक होती राणी' 'मी जिंकलो मी हरलो', 'राजमुकुट', अशा कितीतरी नाटकातील आणि 'मादी' एकांकिकेतील भूमिका आज आठवतात. अर्थात हा तुमच्या भूमिकांचा इतिहास नाही, ही आठवण आहे. आता या भूमिकांच्या जोडीला चित्रपटातील भूमिका येऊन उभ्या राहिल्या आहेत. मराठी 'पिंजरा' च्या अपूर्व यशानं आणि त्याच्या हिन्दी आवृत्तीनं तुम्हाला हिन्दी चित्रपटांचं क्षेत्र उपलब्ध झालंय.

गेली वीस-पंचवीस वर्षे तुमचा अभिनय-प्रवास चालू आहे. कधी सलग तर कधी खंडित अवस्थेत तो प्रवास तुम्ही चालू ठेवलात. अभिनयाच्या या प्रवासात इतरांच्या तुलनेनं व्यावसायिक रंगभूमीवर तुम्ही फार उशिरा आलात-- सहा वर्षांपूर्वी ! या सहा वर्षांत आपल्या अभिनय गुणांनी मराठी रंगभूमी भारावून टाकलीत. विशेष म्हणजे काही अशक्य वाटणाऱ्या कलात्मक गोष्टींना समूर्त केलंत. हौशी रंगभूमीवर कामं करताना एका विशिष्ट लयीतील संथ-शांत पण परिणामकारक आवाजाचा आणि संयत अभिनयाचा वापर जसा

केलात तसाच व्यावसायिक रंगभूमी-वरही केलात. व्यावसायिक रंगभूमीवर येताना तुम्हांला अभिनय पद्धतीशी तडजोड करावी लागणार असं आम्हा साऱ्यांनाच वाटत होतं. त्यावेळी रंगभूमीवरचं वातावरणही तसंच होतं. तुम्ही स्वतःच्या व्यक्तित्त्वातील बेडरपण, आग्रहीपण सोडलं नाहीत, अभिनय पद्धतीतील तडजोड स्वीकारली नाहीत. लोकप्रियतेसाठी भडक आक्रस्ताळेपणानं व्यक्त होणारा अभिनय मंजूर केला नाहीत. तिथंच तुम्ही मोठे ठरलात! एकाच वेळी वादग्रस्त 'गिधाडे' आणि जनमान्य 'नटसम्राट' ही नाटकं केलीत. 'नटसम्राट'च्या यशकीर्तीनं हुरळला नाहीत की 'गार्बो', 'जगदेवराव'च्या अपयशानं होरपळला नाहीत. 'नटसम्राट'च्या उदंड प्रयोगसंख्येनंतर आपणहून तुम्ही दत्ता भटांसारख्या प्रथितयश नटाला ती भूमिका बहाल केलीत. भटांचे कौतुक करण्यासाठी एका समारंभाला प्रमुख वक्ते म्हणून सहभागी झालात. त्यांचे गुणदोष जाहीर सांगितलेत. पुनः एकदा तुमचं मोठेपण सिद्ध झालं डॉक्टर, 'नटसम्राट' मधील ज्या भूमिकेनं तुम्हाला मोठं केलं, उदंड लक्ष्मी दिली ती भूमिका तुम्ही ऐन जोषात सोडलीत. रंगभूमीच्या इतिहासात अशी उदाहरणं विरळाच!

व्यावसायिक रंगभूमीवर अमाप यश पदरी येत असताना तुम्ही सुस्तावला नाहीत. तर त्या यशाचा फायदा घेऊन हौशी-प्रायोगिक नाटयसंस्थांना प्रोत्साहित करीत राहिलात. स्वतःची 'रुपवेध' संस्था काढून 'गार्बो' केलंत. पु. शि. रेगेंचं 'रंगपांचालिक' केव्हातरी करण्याचा तुमचा मानस आहे. प्रायोगिक रंगमंचावर काही कार्य करीत असतानाच 'गिधाडे' 'सखाराम' 'घाशीराम'च्या निमित्तानं निर्माण झालेल्या 'सेन्सॉरशिप'च्या प्रचंड वादळात तुम्ही आपली स्वतःची खंबीर भूमिका घेऊन उभे राहिलात. ठरलेली 'नाईट' घेऊन रातोरात तोंडाचा रंग पुसणारे नट भरपूर आहेत. पण ज्या रंगभूमीनं आपल्याला मोठं केलं तिच्यासाठी सातत्यानं काहीतरी केलं पाहिजे या मस्तीत जगणारे, रंगभूमीचा बुद्धिगम्य विचार करणारे, कलावंत म्हणून आपलं सर्वस्व पणाला लावणारे नट दुर्मिळ आहेत. त्या दुर्मिळामध्ये तुम्ही एक!

मिळालेला बहुमान भवितव्यातील प्रगतीला बोथट करील की काय असं अनेकदा साशंकतेनं म्हटलं जातं. पण तुमचा रंगभूमीवरील अभिनय-प्रवास तसा स्थिरावणार नाही याची आत्तापर्यंतच्या अनुभवानं खात्री आहे. विश्वास आहे. अजून तुम्हाला खूप प्रवास करायचा आहे. तुमच्या मनात असलेले अनेक प्रयोग रंगभूमीवर आम्हाला पाहायचे आहेत. आता खानोलकरांच्या 'प्रतिमा' नाटकातील तुमची भूमिका आणि तेंडुलकरांनी लिहिलेल्या 'सामन्त' चित्रपटातील भूमिका पाहाण्यासाठी आमचे डोळे उत्सुक आहेत. म्हणूनच मागं तुम्ही तेंडुलकरांवर गौरवानं लिहिताना म्हणाला होतात तसेच आता मी तुम्हाला हातातला पेला उंचावून म्हणतो... चिअर्स डॉक्टर! चिअर्स!!

● ● ●

## हिंदी चित्रपट

# हीरा

## स्टंट चित्रपट

सुलतान प्रॉडक्शन्सचा हा रंगीत चित्रपट निर्माते दिग्दर्शक सुलतान अहमद यांनी आपले गुरू के. आसिफ यांना अर्पण केला आहे. 'मोगल-ए-आझम' या भव्य चित्रपट निर्मितीत- आसिफसाहेबांचे असिस्टंट म्हणून त्यांनी काम केले होते. आपल्या या पहिल्याच प्रयत्नात सुलतान अहमद यांनी दिग्दर्शन कौशल्याची चुणूक दाखविली आहे.

चित्रपटाच्या कथानकात तसे नावीन्य नाही; परंतु विविध मानवी भावनांचा संमिश्र आविष्कार यात आढळतो. चित्रपट नायकप्रधान असूनही इतर व्यक्तिरेखाही ठसठशीतपणे चित्रित केल्या आहेत. चित्रपटाचा नायक आहे हीरा. एक सरळमार्गी पण थोडा अवखळ स्वभावाचा तरुण. शेठ धनीरामच्या शब्दात 'शरीफ बापका बदमाश बेटा.' हीराचे वडील रिटायर्ड जज्ज. हीराची ही भूमिका सुनीलदत्तने सहजपणे वठवली आहे. शेठ धनीराम या लालची परंतु भित्र्या जमीनदाराची भूमिका कन्हय्यालाल या जुन्या मुरब्बी नटाने आपल्या अभिनयकौशल्याने प्रभावीपणे साकार केली आहे. विलक्षण बोलका चेहरा आणि संयमित अभिनय ही त्याची वैशिष्टये. शेठ धनीरामची तरुण सुंदर मुलगी आशा (आशापारेख) हिच्यावर हीराचे प्रेम असते. हीरा शेठ धनीरामवर मात्र चिडूनच असतो. कारण धनीराम गरीब गावकऱ्यांवर पैशाच्या लोभाने जुलूम जबरदस्ती करतो. हीरा गावकऱ्यांच्या बाजूने असतो. शेठ धनीरमाची चेष्टामस्करी करणारे अनेक प्रसंग यात आहेत.

शेठ धनीरामच्या संपत्तीवर डोळा ठेवून आशाशी विवाह करू पाहणारा बलवंत (शत्रुघ्न सिन्हा) धनीरामला चिथावणी देत असतो. निर्घृणपणे खून, लूटमार करणारा हा बलवंत गावात साळसूदपणे वावरत असतो. खलनायक बलवंतचा खुनशीपणा, कावेबाजपणा शत्रुघ्न सिन्हाने उत्तमप्रकारे दाखविला आहे, त्याच्या नेहमीच्या पद्धतीनं. मात्र कित्येकदा तो कृत्रिम नि अतिरेकी अभिनय करतो.

लहरिया (फरिदा जलाल) या तरुणीला बलवंत फसवतो नि गुन्हा उघडकीला येणार असे दिसताच तिचा खून करतो. खुनाचा आळ मात्र येतो हीरावर. लहरियाचा बाप जंगो (अन्वर हुसेन) यालाही हीराच खुनी आहे असे वाटते आणि तो सूडभावनेने पेटून उठतो. अन्वर हुसेनचा 'जंगो'—जोरकस वाटतो. 'लहरिया'च्या भूमिकेत तर फरिदा जलालने अभिनयाची कसोटी लावली आहे. तिने विविध भाव फार

चांगल्या रीतीने व्यक्त केले आहेत.

हीरा विचित्र परिस्थितीत गाव सोडून जातो. शहरात प्रामाणिकपणाच्या बळावर प्रतिष्ठा मिळवून परत गावी येतो. बलवंतशी आशाचे जबरदस्तीने लग्न लावण्याचा डाव तो उधळून लावतो. नंतर भयंकर हाणामाऱ्या होऊन लहरियाचा खरा खुनी बलवंतच आहे हे सर्वांच्या लक्षात येते.पाताळयंत्री बलवंत पोलिसांनाही शह देण्याचा प्रयत्न करतो परंतु अखेरीस हीराच्या साह्याने त्याचा अंत नि अखेर हीरा आणि आशा यांचे मीलन होते.

साधारणच परंतु व्यर्थ गुंतागुंत निर्माण केलेले असे हे कथानक. नाट्यपूर्ण संघर्षाने नटलेले अनेक प्रसंग. यात जशा भयंकर हाणामाऱ्या आहेत तशीच नाचगाणीही आहेत. संगीताची बाजू कल्याणजी–आनंदजी यांनी उत्तम सांभाळली आहे. 'मैं तुझसे मिलने आयी मंदिर जानेके बहाने' हे गीत त्याच्या सुंदर चालीमुळे आधीच लोकप्रिय झाले आहे. 'पिया देर ना करो' ह्या गाण्याच्यावेळी दोन वेगवेगळ्या प्रसंगांची गुंफण मोठ्या कल्पकतेने केली आहे. सुलतान अहमद यांच्या दिग्दर्शन कौशल्याच्या अशा खुणा यात बऱ्याच आढळल्या. छायाचित्रण-संकलन इ. तांत्रिक अंगे ठीक आहेत. बाह्यचित्रणासाठी निवडलेली स्थळे योग्य वाटली.

सुनीलदत्त, आशा पारेख, शत्रुघ्न सिन्हा, कन्हय्यालाल, फरिदा जलाल या प्रमुख कलाकारांव्यतिरिक्त अन्वर हुसेन, सुलोचना, मुक्री, नाझीर हुसेन, हेलन, आशा पोतदार इत्यादी अनेकांनी आपापल्या भूमिका व्यवस्थित केल्या आहेत.

चांगले कलाकार, चांगला दिग्दर्शक, चांगले तंत्रज्ञ असूनही चांगल्या कथा न मिळाल्यामुळे असे हाणामारीचे व सवंग करमणुकीचे चित्रपट काढले जातात याचीच 'हीरा 'सारखे चित्रपट पाहिल्यानंतर खंत वाटत राहते.

—सुभाष नाईक


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

## डॉक्टर जगवितात की नागवितात

पृष्ठ ८ वरून

पेशंटच्या अगतिकतेचा फायदा घेतात. पेशंटच्या केवळ खिशातूनच नव्हे तर घशात हात घालून पैसे काढतात. नागवणुकीची ही वृत्ती त्यांच्या रक्तात भिनलेली आहे. ते केवळ जनतेला नागवून थांबत नाहीत तर समव्यावसायिकांना, आया, दाया, नर्सेस या सेवकांनाही नागवितात. आजच्या या डॉक्टरांचे स्वरूप 'इब्लिस डॉक्टरांची टोळी' असे आहे. तरुणांनी, नव्याने या व्यवसायात येणाऱ्यांनी या नागविणाऱ्या डॉक्टरांविरुद्ध चळवळ करून त्यांना जगणे नकोसे केले पाहिजे.' डॉक्टरांच्या सभेत डॉक्टरांपुढेच त्यांच्या पापांचा पाढा वाचून डॉ. लिमये थांबतात. आता वाट पाहायची ती या सर्व आक्षेपांना तर्कशुद्ध उत्तरे कोण देणार याची. आपल्या विषयाची अशी बिनतोड मांडणी अरुण लिमयांनी केली असा कबुलीजबाब प्रारंभीच देऊन पुढील वक्ते डॉ. एस्. एन्. देशपांडे बोलू लागतात. मेडिकल कौन्सिल आणि असोसिएशनने जागरूकपणे कार्य केले पाहिजे असं ते सांगतात... 'काठावर उभे राहून चुका सांगण्यापेक्षा यातून काही तरी मार्ग काढला पाहिजे. समाजव्यवस्था अशी आहे तोपर्यंत हे असेच चालणार. तेव्हा ही समाजव्यवस्था मोडून काढण्यासाठी जोरात कार्य केलं पाहिजे. समाजच बदलला पाहिजे. हडपसरसारख्या ठिकाणी सानेगुरुजी रुग्णालय स्वयंसेवावृत्तीनं काम करीत आहे. तेव्हा त्यावरून चांगलं काम करता येतं हे सिद्ध होतं.' डॉ. देशपांडेही काही विशेष भरीव सांगत नाहीत आणि लिमयांनी मांडलेल्या आक्षेपांना उत्तरं देऊ शकत नाहीत.

पण डॉ. लिमयांच्या आक्षेपांना ठामपणे उत्तरं देण्याच्या अभिनिवेशानं प्रसिद्ध गायनॉकॉलॉजिस्ट डॉ. ए. व्ही. संगमनेरकर व्यासपीठावर येतात... 'समाजवादाच्या भोंगळ कल्पना डोक्यात घेऊन डॉक्टरांच्या व्यवसायाला बदनाम करू नका. बुद्धिवंतांविषयी अनादर निर्माण करू नका,' अशी विनंती करीत संगमनेरकर लिमयांच्या आक्षेपांचे खंडन करू लागतात ... 'डॉक्टर आलेल्या संधीचा दुरुपयोग करीत नाहीत. त्यामुळे नागविण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. जे डॉक्टर्स कष्ट करतात—अधिक वाचतात ते अधिक पैसे मिळवतात. साथीच्या काळात रात्रंदिवस काम करणारे डॉक्टर्स अधिक पैसे घेतात. क्वालिटीतील हा फरक राहणारच. जनरल प्रॅक्टिशनर्स व प्रायव्हेट यांच्यात ऑपरेशनसारख्या गोष्टीत फरक नसतो. प्रोसीजरमध्ये फरक नसतो तर पेशंटच्या सुखसोयींचा विचार अधिक होतो एवढेच. स्पेशालिस्ट डॉक्टरांच्या सिंडिकेटबद्दलचा आक्षेप संपूर्ण खरा नाही. त्यात थोडे सत्य आहे. आपण हळूहळू स्पेशलायझेशनकडे चाललो आहोत हेही लक्षात घ्यायला हवे. हे डॉक्टर्स उगाच ऑपरेशन्स करतात हे म्हणणे मात्र चुकीचे आहे. कुठेतरी डॉक्टराच्या बुद्धिमत्तेवर विश्वास ठेवला पाहिजे. पुढाऱ्यांनी हा

प्रश्न रस्त्यावर आणून धंदा बदनाम करू नये. काही ठिकाणी डॉक्टर नागवत असतील परंतु सर्व डॉक्टरवर्ग तसा नाही. डॉक्टरांविषयीच्या लोकांच्या श्रद्धेला धक्का लावू नका.'

डॉ. लिमयांच्या आक्षेपांना थोडेफार का होईना यशस्वी तोंड दिल्याबद्दल उपस्थितांनी डॉ. संगमनेरकरांचे टाळ्या वाजवून अभिनंदन केले. परंतु डॉ. लिमये यांच्या भाषणाचा प्रभाव अद्यापही टिकून होता. संगमनेरकरांच्या युक्तिवादाने श्रोत्यांचे संपूर्ण समाधान झालेले दिसले नाही. श्रद्धेचा मुद्दा काढून त्यांनी श्रोत्यांच्या भावनेला आवाहन केलं खरं...! समारोपाच्या आपल्या भाषणात नानासाहेब गोऱ्यांनी, 'ज्या समाजाला डॉक्टरांची गरजच पडणार नाही असा समाज निर्माण केला तर... असा आशावादी सूर लावून 'प्रत्येक गोष्टीला धंद्याच्या पातळीवर आणणं हे आजच्या समाजाचं व्यवच्छेदक लक्षण बनलं आहे. माणसाची किंमत पैशावर केली जाते आहे. व्यापारी काय किंवा डॉक्टर काय...सर्वांचे ध्येय एकच. पैसा मिळविणे. एका डॉक्टरला दोषी ठरवून उपयोग नाही. डॉक्टर काय कापतील असे वकील कापतात. काही डॉक्टर काय किंवा यच्चयावत् डॉक्टरवर्ग काय, अध:पतित झाला असेल तर राष्ट्रीयीकरण, सामाजिकरण करूनही भागणार नाही. शब्दांनी समस्या सुटत नाहीत. प्रत्यक्ष अनुभव उलटा आहे. या ज्या कल्पना आहेत त्या प्रत्यक्ष व्यवहारात आणताना शिस्त हवी. खरा मुद्दा असा आहे की, या व्यवसायात समाजाच्या सेवेसंबंधीची भावना कशी निर्माण करता येईल. मनं बदलली पाहिजेत, परिस्थिती बदलली पाहिजे. व्यक्ती बदलल्याखेरीज समाज बदलू शकणार नाही. डॉक्टरी व्यवसायातील लोकांनी हे लक्षात ठेवायला हवं की, 'मी चांगला आहे' असं म्हणून चालत नाही. लोकांनी चांगलं म्हणायला हवं. लोकांना तुमच्याविषयी विश्वास वाटला पाहिजे. आपण दुसऱ्याला बरं करतो म्हणजे एक सामाजिक कर्तव्य करतो. तुम्हीही पिळणाऱ्या वर्गाचा एक भाग आहात असं लोकांना वाटू नये. सगळा पेशा नासून गेला असं म्हणता येणार नाही. परंतु तुमच्यापैकीच काही हे असं का म्हणतात – तेव्हा काहीतरी चुकले आहे – ते सुधारले पाहिजे.'

नानासाहेबांनी अगदी राजकारणी व्यक्तीला शोभतील असे विचार मांडले. 'डॉक्टर नागवितात' हे या परिसंवादात भाग घेणाऱ्यांनी – सर्वांनीच थोडयाफार फरकाने मान्य केले खरे. आपली चूक कबूल करण्यालाही धैर्य लागतं, मनाचा मोठेपणा लागतो, तो या डॉक्टरांनी दाखवला. या परिसंवादास उपस्थित असलेल्या श्रोत्यांपैकी बहुसंख्य डॉक्टर्सच होते. तेव्हा आता या डॉक्टरांनी तरी मनोमन आपली जबाबदारी ओळखावी आणि आपल्या हातून कुणाची नागवणूक–फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी. परिसंवादाचे हेही यश नसे थोडके.

–प्रतिनिधी

## महिलांचा केरसुणी मोर्चा

पृष्ठ ५ वरून

नाहीत, त्या सचिवालयात जायचेच कशाला ? आपण इथंच सभा घेऊ.'

मोर्चा थांबतो. पुन्हा जोराच्या घोषणा. 'मंत्री घाबरले, मंत्री पळाले,' वगैरे. हळूहळू महिला शांत होतात. सूर्य उतरलेला असतो. हुतात्मा चौकाच्या मध्यावर नेत्या उभ्या असतात. आजू बाजूला सर्वत्र महिला बसकण मारतात. ट्रॅफिक पोलिसांची धावपळ. चारही बाजूंनी ट्रॅफिक अडतो.

'तेल नाही, तूप नाही... या सरकारला लाज नाही !'

पदर खोचून अहिल्या रांगणेकर घोषणा देऊ लागतात. सरकारची लाज वारंवार भर चव्हाट्यावर आणली जाते.

मोर्चापुढे भाषण करायला श्रीमती सुशीला पटेल उभ्या रहातात. टाळ्याचा प्रचंड कडकडाट होतो. पदरानं घाम पुसून सुशीला पटेल म्हणतात, आज आपला मोर्चा येणार हे समजताच मंत्री दिल्लीला पळाले. (हास्याची लाट) आमचे मंत्री दिल्लीत पळतात आणि इथं पोलीस महिलांवर कुत्र्यांसारखे हात टाकतात. (शेम शेम) मुख्यमंत्र्यांनी आम्हाला गुन्हेगार ठरवलं पण आमचे म्हणणे आहे की, गुन्हेगार वसंतरावच आहेत. (प्रचंड टाळ्या). धान्य मागितल्यामुळे जर आम्ही गुन्हेगार ठरणार असू तर हा गुन्हा आम्ही हज्जार वेळा करीत राहू (पुन्हा टाळ्यांचा जोरदार कडकडाट)

खासदार सौ. रोझा देशपांडे उभ्या रहातात. हा मोर्चा नाईकांकडे आणि पोलिसांकडे जाब मागण्यासाठी आला आहे. आता जर धान्य मिळाले नाही तर महिला महाराष्ट्र पेटवतील (टाळ्या) हे सांगण्यासाठी आम्ही आलो आहोत (प्रचंड टाळ्या) मग अहिल्या रांगणेकर. आपण सचिवालयात जाणार होतो पण इथेच थांबलो. कारण सचिवालयात मंत्री नाहीत. एकच मंत्री आहे. तो म्हणजे पोपट (हंशा) तो दारूबंदीवाला. मोसंबी, नारंगी, डबल घोड्याची दारू देणारा ! आपला त्याच्याशी संबंध नाही (पुन्हा हंशा) पोलिसांनी आमच्यावर हात टाकले आणि उलट आमच्यावरच खटले भरले (शेम शेम) हे पोलीस ऑफिसर पाणणे दोनशे पौंडांचे (हंशा) आम्ही त्यांच्यावर कसा हल्ला करणार ? मार्चपर्यंत बारा किलो धान्य मिळाले नाही तर महिला गुदामे लुटल्याशिवाय रहाणार नाहीत.

अंधार पडू लागलेला असतो. आमदार मृणाल गोरेंच्या नावाची घोषणा होते. टाळ्यांचा जबरदस्त कडकडाट. मृणाल गोरे पुढे येतात. हातातली पर्स प्रमिला दंडवतेंकडे देतात. संक्रातीच्या दिवशी राज्यपालांनी स्वच्छता सप्ताह सुरू केला. लगेच मुंबई, रामटेक, सांगली, सावंतवाडीत मतदारांनी स्वच्छता सप्ताहाची अंमलबजावणी केली (हंशा) बारा किलो धान्य मिळवण्यासाठी

आम्ही लढत राहू. आम्हाला हिंसा करावयाची वेळ आणू नका, असं माझं सरकारला सांगणं आहे. त्याचे परिणाम फार वाईट होतात. गुजरातमध्ये पहा. भुकेसाठी जनता रस्त्यावर आली तर त्याचे काय परिणाम होतात, त्याचं ते जळतं उदाहरण आहे. आम्ही केरसुणी घेऊन बाहेर आलो आहोत. सरकार जर वेळीच सावध झालं नाही तर महाराष्ट्रातल्या महिलाच आता कॉंग्रेसची घाण या केरसुणीनं साफ केल्याशिवाय राहणार नाहीत.

टाळ्यांच्या कडकडाटात मृणाल गोरे भाषण संपवतात. पुन्हा महिलांच्या घोषणा. 'तेल नाही, तूप नाही...या सरकारला लाज नाही.' किणकिणते आवाज तार सप्तकात जात असतात. हुतात्मा चौकातले दिवे लागलेले असतात. मोर्चा पांगतो. महिला धावतपळत घरी निघतात. रात्रीच्या स्वयंपाकाची तयारी त्यांनाच करावयाची असते. ●

[ गेल्या अंकातील राऊत यांच्या बी. डी. डी. चाळीसंबंधीच्या लेखात आंबेडकर मैदानाच्या ठिकाणी जांबोरी मैदान असे चुकीने लिहिले गेले आहे. लेखकाने याबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे. ]




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. PNC-68

# ग्रामायन

द्वारा साप्ताहिक माणूस, १०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

अध्यक्ष : प्रा व. द. देशपांडे
उपाध्यक्ष : भा. कृ. केळकर
प्रा. श. द. कुलकर्णी
कार्याध्यक्ष : दि. वि. गोखले
कोषाध्यक्ष : श्री. ग. माजगावकर
कार्यवाह : विंदुमाधव जोशी
संघटक : रविकिरण साने
सदस्य : डॉ. अच्युतराव आपटे
गोविंदराव शिंदे
बाबुराव दौंडकर
अंबरसिंग सुरतवंती
प्रा. स. ह. देशपांडे
मधुकर देवल
प्रा. राम डिंबळे
चंद्रशेखर मराठे
प्रकाश जावडेकर